जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# जिल्हा बँकेच्या बिनविरोध निवडीचे गुऱ्हाळ सुरुच

**विखे-थोरात-गडाख विरोधात लंके-लोखंडे एकत्र, तर राम शिंदे यांचा सवतासुभा; ११ जागा बिनविरोध, १० जागांसाठी २७ उमेदवार रिंगणात, २ नोव्हेंबरला मतदान**



जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी चिन्ह वाटपाच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांशी चर्चा करताना खा.नीलेश लंके, माजी खासदार सदाशिव लोखंडे, कैलास वाकचौरे व सहकार परिवर्तन पॅनलचे कार्यकर्ते. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर - बहुचर्चित जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न फोल ठरल्यानंतर आणखी काही जागा बिनविरोध करण्यासाठी वरिष्ठ नेत्यांसह निवडणूक यंत्रणाही कमालीची सक्रिय झालेली दिसली. अर्ज माघारीची मुदत काल दुपारी तीन वाजताच संपलेली असताना सायंकाळी सातच्या दरम्यान नगर तालुका सेवा सोसायटी मतदारसंघातून आ. अक्षय कर्डिले यांची बिनविरोध निवड झाली. हे कमी काय म्हणून आज दुसऱ्या दिवशी चिन्ह वाटपाच्या वेळी जामखेड सेवा सोसायटी मतदारसंघातून सचिन घुमरे व श्रीगोंदे सेवा सोसायटी मतदारसंघातून दत्तात्रय पानसरे यांची बिनविरोध निवड झाल्याने निवडणूक विभागाच्या भुमिकेने सारेच आवक झाले आहेत. या निर्णयाविरोधात काही सामाजिक संघटना न्यायालयात जाणार आहेत.

दरम्यान, जिल्हा बँकेच्या २१ पैकी ११ जागा बिनविरोध झाल्याने उर्वरीत १० जागांसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजीमंत्री बाळासाहेब थोरात व ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांचे सहकार विकास पॅनल, खा.नीलेश लंके व माजी खासदार सदाशिव लोखंडे यांचे सहकार परिवर्तन पॅनल, तर विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपला सवतासुभा उभारत तीन जागांवर उमेदवार देत तिसरा स्वतंत्र पॅनल केला आहे. बिनविरोध झालेल्या ११ जागांपैकी १० जागा विखे-थोरात-गडाख गटाच्या असल्याचे उघड असून श्रीगोंदेमधून पानसरे हे आमच्या पॅनलचे असल्याचा दावा खा. लंके यांनी केला आहे. सहकाराच्या राजकारणात पानसरे हे विखे यांच्याशी जवळीक साधून असतात त्यामुळे ते नक्की कुणाचे हा तूर्त संभ्रमच आहे. तर, जामखेडमधून बिनविरोध झालेले घुमरे हे राम शिंदे यांचे समर्थक आहेत. उर्वरीत १० जागांसाठी २७ उमेदवार रिंगणात असून यात विखे-थोरात-गडाख गटाचे ८, लंके-लोखंडे गटाचे ७, तर शिंदे गटाचे ३ उमेदवार असून ९ अपक्ष उमेदवार आहेत. या १० जागांसाठी २ नोव्हेंबरला मतदान, तर लगेच दुसऱ्या दिवशी ३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. विखे-थोरात-गडाख गटाला कपबशी, लंके-लोखंडे गटाला छत्री, राम शिंदे गटाला शिट्टी तर अपक्षांना विविध चिन्हे मिळाली आहेत.

## काहींनी कालच माघार घेतली असल्याचा निवडणूक विभागाने केला दावा

अर्ज माघार घेण्याची मुदत काल दुपारी तीन वाजेपर्यंत असताना काल रात्री उशिरा एक व परत आज सकाळी चिन्ह वाटप करताना दोन जागा बिनविरोध कशा झाल्या असा सवाल खा. लंके यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी व काही सामाजिक संघटनांनी उपस्थित करत या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. यावर स्पष्टीकरण देताना निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, काल दुपारी तीन वाजता अर्ज मागे घेण्याच्या वेळी माघारीसाठी मोठी गर्दी झाली. ज्यांनी अर्ज मागे घेतले त्या प्रक्रियेत जास्त वेळ गेल्याने आम्ही आज चिन्ह वाटप करताना शिल्लक राहिलेल्या उमेदवारांची यादी जाहीर करणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार आम्ही आज ज्यांचे अर्ज शिल्लक आहेत त्यांना चिन्ह वाटप करून अंतिम उमेदवारांच्या याद्या प्रसिध्द केल्या आहेत. ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व निपक्षपणे पार पाडल्याचा दावा निवडणूक विभागाकडून केला जात असला तरी अनेकांनी याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत न्यायालयात जाण्याचा इशारा दिल्याने ही निवडणूक कोणते नवे वळण घेते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

### बिनविरोध झालेल्या अकरा जागा

१) **रणजीत देशमुख** - संगमनेर सेवा सोसायटी मतदारसंघ
२) **शंकरराव गडाख** - नेवासा सेवा सोसायटी मतदारसंघ
३) **बिपीन कोल्हे** - कोपरगाव सेवा सोसायटी मतदारसंघ
४) **राजश्री घुले** - शेवगाव सेवा सोसायटी मतदारसंघ
५) **करण ससाणे** - श्रीरामपूर सेवा सोसायटी मतदारसंघ
६) **सुजय विखे** - राहाता सेवा सोसायटी मतदारसंघ
७) **मोनिका राजळे** - पाथर्डी सेवा सोसायटी मतदारसंघ
८) **अक्षय कर्डिले**- नगर तालुका सेवा सोसायटी मतदारसंघ
९) **दत्तात्रय पानसरे** - श्रीगोंदे सेवा सोसायटी मतदारसंघ
१०) **सचिन घुमरे** - जामखेड सेवा सोसायटी मतदारसंघ
११) **सचिन जगताप** - बिगर शेती मतदारसंघ

## जामखेड-कर्जत तालुक्यात विखे- शिंदे सोबत असल्याचा दावा

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी आधी बिनविरोधचे प्रयत्न झाले, पण त्यात यश न आल्याने बँकेत विखे, लंके यांचे दोन पॅनेल व राम शिंदे यांचे तीन उमेदवारांचे वेगळे पॅनल तयार झाले आहे. पण विखे यांच्या गोटातून असा दावा केला जात आहे की, जामखेड-कर्जत तालुक्यात विखे व शिंदे एकत्र आहेत. जामखेडमध्ये त्यामुळे शिंदे समर्थक सचीन घुमरे हे बिनविरोध झाले, तर कर्जतमध्ये त्यांच्या उमेदवार ज्योती शिंदे यांना आमचा पाठिंबा आहे. असे असले तरी शिंदे यांनी महिला राखीव प्रवर्गातून त्यांच्या समर्थक असलेल्या मंजुषा गुंड यांना तर, ओबीसी प्रवर्गातून आजीनाथ हजारे यांना उभे केल्याने स्थानिक पातळीवर विखे व शिंदे यांची एकी तर जिल्ह्यात बेकी असे चित्र दिसत आहे.

## भाजपाचे सर्वच पॅनलमध्ये उमेदवार

जिल्हा बँकेची निवडणूक ही सहकारातील निवडणूक असल्याने यात पक्षीय राजकारण नको असा सूर आवळत प्रस्थापित व विस्थापित नेत्यांनी आपआपल्या सोयीने भुमिका घेतल्या आहेत. विखे हे भाजपाचे नेते असून त्यांनी इंदिरा काँग्रेसचे थोरात व सेनेच्या ठाकरे गटाचे गडाख यांच्या सोबत आघाडी केली आहे. राष्ट्रवादी अजीत पवार गटाचेही अनेक नेते या पॅनलमध्ये आहेत. त्यामुळे त्यांच्या पॅनलमध्ये सर्वपक्षीय लोक सहभागी असून यात भाजपाचेही अनेक उमेदवार बिनविरोध झाले असून काही रिंगणात आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे लंके व शिंदे सेनेगटाचे लोखंडे एकत्र आले असून त्यांच्या पॅनलमध्ये भाजपाचे कैलास वाकचौरे हेही उमेदवार आहेत. तर भाजपाचे राम शिंदे यांनी सवतासुभा मांडत एक जागा बिनविरोध मिळविताना तीन ठिकाणी उमेदवार दिले आहेत. दुसरीकडे जे अपक्ष उमेदवार आहेत त्यातही राहुरीमधून लढत असलेले अपक्ष उमेदवार देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजीत कदम हे भाजपाचेच आहेत. म्हणजे तिन्ही गटासोबतच अपक्षांमध्येही भाजपाच्या उमेदवारांचा समावेश आहे.

## सुजय विखे यांच्या विरोधातील याचिका फेटाळली

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उमेदवारीला आव्हान देणारी एकनाथ घोगरे यांची याचिका छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे डॉ. विखे यांच्या उमेदवारीवरील न्यायालयीन आव्हान दूर झाले असून, राहाता सेवा संस्था मतदारसंघातून जिल्हा बँकेच्या संचालकपदी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. विखे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या उमेदवारीवर विरोधी उमेदवार एकनाथ घोगरे यांनी हरकत घेतली होती. मात्र, निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनी ही हरकत फेटाळून लावली. या निर्णयाविरोधात घोगरे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती मंजुषा अजय देशपांडे यांच्यासमोर अंतिम सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने घोगरे यांची याचिका फेटाळली. त्यामुळे डॉ. विखे पाटील यांच्या उमेदवारीला न्यायालयात दिलेले आव्हान निष्प्रभ ठरले. या प्रकरणात डॉ. विखे यांच्या वतीने ॲड. विनायक होन आणि ॲड. अभय ओस्तवाल यांनी बाजू मांडली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ॲड. सुभाष तांबे, तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या वतीने ॲड. साहेबराव कदम यांनी काम पाहिले.

## लहामटे, कदम, गायकर, पिसाळ यांचे एकला चलो रे

अकोले सेवा सोसायटी मतदारसंघातून आ. किरण लहामटे यांनी कोणासोबतच न जाता अपक्ष अर्ज ठेवला आहे. त्यांच्याविरोधात उभ्या असलेल्या संजीवनी शिंदे याही अपक्षच लढत आहेत. त्या बॅंकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांच्या कन्या असून लहामटे व गायकर हे दोन्ही राष्ट्रवादी अजीत पवार गटात असताना त्यांनी एकमेकांविरोधात दंड थोपटले आहेत. अकोलेचे भाजपाचे माजी आमदार वैभव पिचड हे मात्र विखे-थोरात गटाकडून भटक्या विमुक्त प्रवर्गातून लढत आहेत. तर, दुसरीकडे याच तालुक्यातील भाजपाचेच कैलास वाकचौरे हे लंके यांच्या गटाकडून ओबीसी प्रवर्गातून लढत आहेत. राहुरीमध्ये आमदार प्राजक्त तनपुरे हे विखे-थोरात गटाकडून लढत असून त्यांच्याविरोधात देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजीत कदम उभे ठाकले आहेत. त्यांनीही कुणासोबत न जाता स्वतंत्र राहणे पसंद केले आहे. कर्जतमध्ये अंबादास पिसाळ हे विखे समर्थक आहेत पण त्यांनीही आपल्या मुलाचा तुषार हा अपक्ष लढत आहे.

## जावायासाठी सासऱ्यांचे प्रयत्न पडले अपुरे

शेती पूरक मतदारसंघातून कोपरगावचे आमदार आशुतोष काळे हे विखे-थोरात गटाकडून लढत असून त्यांच्याविरोधात सुधीर रावसाहेब म्हस्के हे लंके गटाकडून उभे आहेत. ही जागा काळे यांच्यासाठी बिनविरोध व्हावी यासाठी त्यांचे सासर बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले हे काल बॅंकेत ठाण मांडून होते. इतर उमेदवारांनी या प्रवर्गातून अर्ज माघारी घेतले पण म्हस्के यांचा अर्ज राहिल्याने घुले त्यांची बराच वेळ बंद खोलीत मनधरणी करत होते. परंतु त्यात यश आले नाही. म्हस्के आपल्या उमेदवारीवर ठाम राहिले.

## दोन आमदार बिनविरोध, तिघे रिंगणात

पाथर्डी सेवा सोसायटी मतदारसंघातून आमदार मोनिका राजळे व नगर तालुका सेवा सोसायटी मतदारसंघातून आमदार अक्षय कर्डिले हे दोन आमदार बँकेवर बिनविरोध निवडून गेले असून आता आशुतोष काळे, किरण लहामटे व प्राजक्त तनपुरे हे तीन आमदार निवडणूक रिंगणात आहेत. खासदार नीलेश लंके हे निवडणूक रिंगणात असून माजी खासदार डॉ. सुजय विखे हे बिनविरोध निवडून गेले आहेत. माजी खासदार सदाशीव लोखंडे यांचे चिरंजीव प्रशांत लोखंडे हे निवडणूक लढवत असून वैभव पिचड हे माजी आमदार निवडणूक रिंगणात आहेत. माजीमंत्री शंकरराव गडाख हे बिनविरोध निवडून आले आहेत.

### अशा होणार १० जागांवर लढती

**पारनेर सेवा सोसायटी मतदारसंघ**

खा. निलेश लंके (सहकार परिवर्तन पॅनल, चिन्ह- छत्री) विरुद्ध राहुल शिंदे (सहकार विकास पॅनल, चिन्ह- कपबशी)

**राहुरी सेवा सोसायटी मतदारसंघ**

आ. प्राजक्त तनपुरे (सहकार विकास पॅनल, चिन्ह- कपबशी) विरुद्ध सत्यजीत कदम (अपक्ष, चिन्ह- किटली)

**अकोले सेवा सोसायटी मतदारसंघ**

आ. किरण लहामटे (अपक्ष, चिन्ह- किटली) विरुद्ध संजीवनी शिंदे (अपक्ष, चिन्ह- शिट्टी)

**कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघ**

तुषार पिसाळ (अपक्ष, चिन्ह- किटली) विरुद्ध ज्योती शिंदे (राम शिंदे गट, चिन्ह- शिट्टी)

**महिला राखीव मतदारसंघ २ जागा**

अनुराधा नागवडे व संगिता वाघ (सहकार विकास पॅनल, चिन्ह- कपबशी) विरुद्ध हर्षदा काकडे व संध्या महाडुंळे (सहकार परिवर्तन पॅनल, चिन्ह- छत्री), मंजुषा गुंड (राम शिंदे गट, चिन्ह- शिट्टी), पुष्पा गायकवाड (अपक्ष, चिन्ह- कपाट) , सुवर्णा पाचपुते (अपक्ष, चिन्ह- बॅट)

**इतर मागास प्रवर्ग(ओबीसी) मतदारसंघ**

कारभारी जावळे (सहकार विकास पॅनल, चिन्ह- कपबशी) विरुद्ध जालिंदर वाकचौरे (सहकार परिवर्तन पॅनल, चिन्ह- छत्री), अजिनाथ हजारे (राम शिंदे गट, चिन्ह- शिट्टी) शिवदास गुंजाळ (अपक्ष, चिन्ह- ॲटो रिक्षा), कडूचंद शेटे (अपक्ष, चिन्ह- प्रेशर कुकर)

**अनुसूचित जाती -जमाती राखीव मतदारसंघ**

वैभव पिचड(सहकार विकास पॅनल, चिन्ह- कपबशी) विरुद्ध प्रशांत लोखंडे (सहकार परिवर्तन पॅनल, चिन्ह- छत्री)

**भटके विमुक्त राखीव मतदारसंघ**

गणपतराव सांगळे (सहकार विकास पॅनल, चिन्ह- कपबशी) विरूध्द ऋषीकेश ढाकणे (सहकार परिवर्तन पॅनल, चिन्ह- छत्री) सुभाष गिते (अपक्ष, चिन्ह- कीटली)

**शेती पूरक राखीव मतदारसंघ**

आ. आशुतोष काळे (सहकार विकास पॅनल, चिन्ह- कपबशी) विरुद्ध सुधीर म्हस्के (सहकार परिवर्तन पॅनल, चिन्ह- छत्री)

# लिफ्ट देवून महिलेचे सोन्याचे दागिने लांबवले

नगर - केडगाव येथील सोनेवाडी फाटा परिसरात एस. टी. बसची वाट पाहत उभ्या असलेल्या वृद्ध महिलेचा विश्वास संपादन करून तिची फसवणूक करत तिच्या जवळील ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने एका अनोळखी भामट्याने लांबवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वत्सलाबाई विश्वनाथ काळे (वय ७५, रा. मु. पो. सारोळा कासार, ता. नगर) या १ ऑक्टोबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास केडगाव येथील सोनेवाडी फाट्यावर एस. टी. बसची वाट पाहत उभ्या होत्या. त्यावेळी तिथे आलेल्या एका अनोळखी व्यक्तीने वत्सलाबाई यांना मी तुमच्या मुलाला आबासाहेबला ओळखतो, तो माझा मित्र आहे, मी सारोळ्याला चाललो आहे तुला सोडवितो, असे गोड बोलून आपल्या मोटारसायकलवर बसवले.

मोटारसायकलवर बसल्यानंतर त्या महिलेची पिशवी मोटारसायकलच्या पेट्रोलच्या टाकीवर ठेवायला सांगून आरोपी तिच्याशी गप्पा मारत पुढे निघाला. या दरम्यान संधी साधून आरोपीने पिशवीत असलेल्या १५ ग्रॅम वजनाच्या व ८० हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या दागिन्यांची परस्पर चोरी केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर वत्सलाबाई काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) नुसार अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास स.फौ. गोविंद गोल्हार करत आहेत.

## अनिल सोले यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - नवलेनगर येथील रहिवासी अनिल दिगंबर सोले (वय ७८) यांचे २२ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. राहुल सोले यांचे ते वडील होत.

## गौरुबाई म्याकल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी येथील सिमला कॉलनी, विठ्ठल मंदिरा जवळील रहिवासी गौरुबाई नारायण म्याकल (वय ८५) यांचे २२ ऑक्टोबर रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अंबादास म्याकल यांच्या त्या मातोश्री होत.

## शामराव खांडरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - वंजारगल्ली येथील रहिवासी शामराव माधवराव खांडरे (वय ७६) यांचे २१ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, पुतण्या असा परिवार आहे. प्रदीप, दिलीप, संदीप खांडरे यांचे ते वडील होत.

## शशिकलाबाई शेंडे यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - पाटीलगल्ली येथील रहिवासी शशिकलाबाई देवदत्त शेंडे (वय ६८) यांचे १६ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. देवदत्त शेंडे यांच्या पत्नी, निखिल, निलेश, तृप्ती प्रविण कटोरे यांच्या त्या मातोश्री होत.

## सुरेश लोढा यांचे हृदयविकाराने निधन



पुणे - शगुन अपार्टमेंट, कोंढवा बु.पुणे येथील रहिवासी सुरेश कुंदनमल लोढा (हिंगणगाववाला) (वय ७२) यांचे २१ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २२ ऑक्टोबर रोजी वैकुंठधाम विजय डेअरी फार्म जवळ संतोषनगर कात्रज पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, नातवंडे, पुतणे, ३ भाऊ, भावजया असा परिवार आहे. डॉ. अशोक, प्रकाश, मदनलाल यांचे बंधू, रुपेश, स्वप्निल, स्मिता याचे वडील तर रुपेश व प्रविण यांचे ते चुलते होत.

हर काम देश के नाम

**CANTONMENT BOARD OFFICE AHILYANAGAR**
AMX Chowk, Camp Ahilyanagar-2414002 (Maharashtra)
Phone No. :- 0241-2326008 Fax No. 0241-2340739
Email : ahmedngrcantt@gmail.com Website : www.cbahmednagar.com

अंतर्राष्ट्रीय सहकारिता वर्ष 2025

## E-TENDER NOTICE

**Online E-Tender form, NIT & Financial bid format are available on the CPP site** https://defproc.gov.in/nicgep/app **Contractor/Bidders/Firms can see the above website time to time for any changes or information.**

| Sr. No. | Name of Works —Description of work (Maintenance period 24months from satisfactory completion of work for serial No.01 to 03 & 05 to 08) | Approx. tender cost of work Rs. | Earnest Money Rs. | Cost of Tender Form in Rs |
|---|---|---|---|---|
| 01 | M&L annual repair/ maintenance & improvement to Drains in Cantonment area. (Under15Sth FC) | Rs.20,00,000/- | Rs.20,000/- | Rs.2,000/- +GST |
| 02 | Water Supply-Replacing/Main. of old pipe lines into 80/100mm CI Pipe lines in Civil (Under15th FC) | Rs.20,00,000/- | Rs.20,000/- | Rs.2,000/- +GST |
| 03 | Re carpeting/maintenance of Tar roads in Cantonment Area. (Under15th FC) | Rs.20,00,000/- | Rs.20,000/- | Rs.2,000/- +GST |
| 04 | Repair & maintenance of Bore wells/ Hand pumps in Ahilyanagar Cantonment area. (Under Cantt. fund) | Rs.7,00,000/- | Rs.7,000/- | Rs. 1,000/- +GST |
| 05 | Maintenance Cantonment Fund building (Under 15th FC) | Rs.20,00,000/- | Rs.20,000/- | Rs.2,000/- +GST |
| 06 | Maintenance work in Sy.No.76, Shopping Plaza (Under Cantt. fund) a)Maintenance of compound wall. b)Fixing of interlocking concrete paving blocks. | Rs.10,00,000/- | Rs.10,000/- | Rs. 1,000/- +GST |
| 07 | Construction of Compound wall at Darewadi trenching ground, (Under15th FC) | Rs.48,00,000/- | Rs.48,000/- | Rs.3,000/- +GST |
| 08 | Maintenance of public group latrines (Under Cantt. Fund) | Rs.7,00,000/- | Rs.7,000/- | Rs.1,000/- +GST |

Publish date & Date of issue/ bid submission — : 26-10-2026.
End date of submission : 15-11-2026.
For detailed information please refer CPPP site.

The Cantonment Board / Chief Executive Officer reserve the right to accept or reject any or all tenders without assigning any reason.

Disclaimer :- It is requested not to wait till last date for submission of bid. This office is not responsible for Complaints of Technical Problem at NIC side & Bidder side.

No. ANR/Main.Works/ 2026-27
Office of the Cantonment Board, Ahilyanagar
Dated : 23-10-2026
0241-2326008(0)

Chief Executive Officer
Ahilyanagar
Cantonment Board,
(Vikash Kumar I.D.E.S)

नेमलेली तारीख २५/११/२०२६

**ॲड.नेहा गांधी-सुराणा**
जिल्हा न्यायालय, अहमदनगर
मो नं.९११९४५५५४२

## जाहीर नोटीस

अहमदनगर येथील मे.१९ वे दिवाणी न्यायाधिश साहेब, वरीष्ठ स्तर, (मे.सपाटे साहेब) अहमदनगर यांचे कोटीत... निशाणी १२

वारस चौकशी अर्ज नंबर ३३१/२०२६ **अर्जदार**

**१) श्रीमती विजया माधवराव गायकवाड**
रा.२११,अंबर अपार्टमेंट,सावेडी, अ.नगर
**२) नितीन अशोक साळवी**
**३) नयना अशोक साळवी**
दोघे रा.५४५,भवानीपेठ, मेमजादे अपार्टमेंट, रुम नं.६, पुणे सिटी, स्वारगेट, पुणे ४१०४२
सामनेवाले
कोणीही नाही

ज्या अर्थी अर्जदार नंबर १ हिची अविवाहीत बहिण व अर्जदार नंबर २ व ३ यांची मावशी नामे शोभा माधवराव गायकवाड ही पुणे येथे दि.०७/०१/२०२० रोजी मयत झालेली असून, तिला अर्जदार नंबर १ ही बहिण व अर्जदार नंबर २ व ३ हे मयत बहिण सरोज हिचे मुले (भाचे) असे कायदेशिर वारसदार असल्याने. मयत शोभा माधवराव गायकवाड हिचे नांवे खालील परीशिष्टात नमुद स्वकष्टार्जित मिळकतीस अर्जदार नंबर १ हिचे नांव लावण्यास अर्जदार नंबर २ व ३ यांची काहीएक हरकत नसल्याने, अर्जदार नंबर १ हिचे नांवाने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात केला आहे. मयत शोभा माधवराव गायकवाड हिने तिचे हयातीत कोणतेही मृत्युपत्र, बक्षीसपत्र अथवा कोणतेही व्यवस्थापत्र करुन ठेवलेले नाही. मयताचे नांवावरील

**मिळकतीचे परीशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील अहिल्यानगर शहर भागातील न.र.यो.क्र४ मधील अंतिम भुखंड क्र.१०१/६१/६२/६९ चे क्षेत्र १३१३.०० चौ.मी. यावर "अंबर" या नावाने बांधलेल्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र .२११ क्षेत्र ३२.५३ चौ.मी.
येणेप्रमाणे परीशिष्ट असे.

त्या अर्थी मयत शोभा माधवराव गायकवाड हिला अर्जदार नंबर १ ते ३ कायदेशिर वारस नाहीत व मयताचे नांवावरील परीशिष्टात नमुद मिळकतीस अर्जदार नंबर १ हिचे नांवाने वारसप्रमाणपत्र घेण्याचा व मिळण्याचा कायदेशिर हक्क व अधिकार नाही असे जर कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून एक महिन्याचे मुदतीत लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी या न्यायालयात हजर कळवाव्यात. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास लागलीच सदरहु न्यायालय अर्जदारांचा पुरावा घेवून वर नमुद मयताचे नांवावरील. मिळकतीस अर्जदार नंबर १ हिचे नांवाने वारसप्रमाणपत्र अदा करतील व मग तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

आज दि. २१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.
नेमलेली तारीख २५/११/२०२६.

**बेंच क्लार्क** सि.ज.सि.डि. अहमदनगर
**अधिक्षक** सि.ज.सि.डि. अहमदनगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर व्यवहारापोटी आमचे आशिलांनी विद्यमान मालकांना विसार रक्कम दिलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे, परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालु वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष, लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांसह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकत वर्णन :- जिल्हा तुकडी व पोट तुकडी तालुका अहिल्यानगर पैकी मा. दुय्यम निबंधक, अहिल्यानगर यांचे कक्षेतील, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे अहिल्यानगर शहर/अहिल्यानगर १ येथील निर्वेध, निजोखमी मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

| नगर भूमापन क्रमांक/सि. स. नं. | क्षेत्रफळ |
|---|---|
| २१७८ | ९२७.३० चौ. मी. |

**यांसी चतुःसिमा :-**
पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस - नगर भूमापन क्रमांक/सि. स. नं. २१८१,
पश्चिमेस - गल्ली, उत्तरेस - नगर भूमापन क्रमांक/सि. स. नं. २१७७.

यावर बांधलेल्या मानस सरोवर या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील ऑफिस नं. २ याचे बिल्टप क्षेत्र १३४.३५ चौ. मी., या मिळकती मध्ये श्री. सागर ब्रिजमोहन बक्षी, श्री. रविंद्र परमानंद बक्षी HUF यांचा ३३.३३ टक्के हिस्सा, श्री. प्रकाश भानुशंकर मेहता यांचा ३३.३४ टक्के हिस्सा व श्री. संजय रमेश मेहता, श्री. प्रतीक उमेदराय मेहता यांचा ३३.३३ टक्के हिस्सा आहे.

**यांसी चतुःसिमा :-**
पुर्वेस - डक्ट आणि पॅसेज, दक्षिणेस - ऑफिस नं. १,
पश्चिमेस - मार्जिनल स्पेस, उत्तरेस - ओपन स्पेस.

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक -**
**श्री. सागर ब्रिजमोहन बक्षी, श्री. रविंद्र परमानंद बक्षी ता HUF, श्री. प्रकाश भानुशंकर मेहता, श्री. संजय रमेश मेहता, श्रा. प्रतीक उमेदराय मेहता,** सर्व रा. अहिल्यानगर.

**ॲड. शामसुंदर व्हि. भुतडा**
पत्ता-शॉप नं. ९ पुजा अपार्टमेंट सहकार सभागृह रोड, अहिल्यानगर
मो. ०९४२३७९२९२२



विजयादशमीनिमित्त श्री अहमदनगर ओसवाल पंचायत सभेच्यावतीने केशरगुलाब मंगल कार्यालयात सामूहिक सीमोल्लंघन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# चांगल्या विचारांतून समाजात एकोपा वृद्धिंगत व्हावा

## नरेंद्र फिरोदिया यांचे आवाहन; श्री अहमदनगर ओसवाल पंचायत सभा आयोजित सामूहिक सिमोल्लंघन कार्यक्रम उत्साहात

नगर – भारतीय संस्कृतीत विजयादशमी सणाचे मोठे महत्व आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी पूर्ण मुहूर्त असलेल्या या सणाला शुभकार्याची सुरुवात करण्यात येते. तसेच या दिवशी सिमोल्लंघनाचीही परंपरा आहे. याचा अर्थ आपण नव्या उमेदीने नव्या कार्यासाठी सज्ज व्हायचे असते. जैन समाजाने भावी वाटचालीसाठी एकत्रित सिमोल्लंघन करून एकोप्याचा संदेश दिला आहे. समाजाला प्रगतीच्या दिशेने न्यायचे तर एकत्र येणे, विचारांची देवाणघेवाण करणे आवश्यक आहे. चांगल्या विचारांचे सोने लुटुन एकत्र येत उज्वल भविष्याकडे वाटचाल करूया, असे आवाहन श्री अहमदनगर ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

विजयादशमीनिमित्त श्री अहमदनगर ओसवाल पंचायत सभेच्यावतीने केशरगुलाब मंगल कार्यालयात सामूहिक सीमोल्लंघन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वांनी विधीवत पूजा केली. पारंपरिक पेहराव करून समाजबांधव यात सहभागी झाले होते. शमी वृक्षाच्या पानांचे हळदीकुंकु, अक्षता अर्पण करून मंत्रोचारात पूजन करण्यात आले. या पूजेचे पौराहित्य गणेश गुरुजी यांनी केले. सर्वांनी एकमेकांना आपट्याची पाने देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी जैन ओसवाल पंचायत सभेचे प्रधान मंत्री शैलेश मुनोत, सह सेक्रेटरी संतोष गांधी, कमलेश भंडारी, सी.ए. महेश भळगट, सुनिल मुनोत, बाळासाहेब भंडारी, संतोष डुंगरवाल, ॲड. विजय मुथा, डॉ. विजय भंडारी, नितिन शिंगवी, समीर बोरा, अतुल शिंगवी, प्रितम पोखरणा, प्रशांत मुथा, अमित मुथा, प्रमोद गांधी, ओसवाल पंचायत सभेचे व्यवस्थापक सुरेश फिरोदिया आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात हजारो समाजबांधव सहभागी झाले होते.

नरेंद्र फिरोदिया पुढे म्हणाले, जैन समाज हा अतिशय धार्मिक वृत्तीचा आणि सचोटीने व्यवहार करणारा आहे. नगरच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपला समाज सातत्याने योगदान देत आहे. समाजातील एकी आणि परस्पर सौहार्द अतिशय महत्वाचा आहे. त्यादृष्टीने संपूर्ण समाजाला एका माळेत गुंफण्यासाठी ओसवाल पंचायत सभा कायम प्रयत्न करीत आहे. एकीचे बळ काय असते हे प्रत्येकाला माहिती आहे. सण उत्सव साजरे करताना एकत्र आल्याने चांगल्या विचारांचा दरवळ सर्वत्र पसरतो. यातून प्रत्येकाला आणखी प्रगती साधण्यासाठी बळ मिळते.

सिमोल्लंघन कार्यक्रमासाठी केशरगुलाब मंगल कार्यालय उपलब्ध करून दिल्याबद्दल नेवासकर– मुनोत परिवाराचे ओसवाल पंचायत सभेच्यावतीने आभार व्यक्त करण्यात आले. बाळासाहेब भंडारी यांनी आभार मानले. सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

# प्रेरणादायी अक्षरधन

## इंद्रियांचे गुलाम होऊ नये

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन: दिशान फिचर्स




कोणी म्हणतात इंद्रियापासून मिळणारे सुख काय कामाचे? विषयातून प्राप्त होणारे ते सुख दुःखमिश्रित असते. असेल, पण म्हणून काय ते त्याज्य मानायचे? मूर्खपणा आहे हा. पांढरी शुभ्र तांदूळ असतो सुगंधी, खायला चवदार. पण त्यासाठी भात कांडावे लागते. पण भुसा निघतो. तोंडावर उडतो, कपडे खराब करतो. पण म्हणून काय ते भात फेकून द्यायचे? फेकतो तो मूर्ख ठरतो.

पोट फुगते, अपचन होते, झोप येते, म्हणून का कोणी उपवासच करीत बसते? जगण्यापुरते खा. अपचन होईल इतके खात बसू नका. मग खाण्यासाठी येणारे दुःख भोगावे लागणार नाही. आमच्या मित्राला काल झोपच लागली नाही. कारण त्याने खूप खाल्ले होते. फार खादाड, भोजनावर अतिशय प्रेम. बिघडणारच पोट. पण आता त्या मित्राला आणखी एक दुःख होतं आहे की आज जेवता येणार नाही.

विषयोभोग अपेक्षित. पण त्याचा अतिरेक मात्र उपेक्षित. बृहस्पती नेमके हेच सांगतात. अतिरेकामुळे दुःख होते. म्हणून उपभोगांचाच त्याग करायचा, असे नव्हे. मनाला आवर हवा. उपभोग मर्यादेत ठेवा. इंद्रिये हाच माणूस. इंद्रिये उपयोगात न आणली, तर बेकाम होतील. पण

घाम काढणारा उन्हाळा संपला आणि आकाशात मेघ दाटून आले. अगदी गरजत आले. मग मोर नाचायला लागले. इतरांना सुखद पावसाळ्याच्या आगमनाचे भाकितच करता आले नाही, तर नृत्य करायला स्फूर्ती येईल कुठून? कोकिळेच्या कुहूकूहुचे कौतुक कुणाला? ज्यांचे कान काम करत असतील त्यांनाच. बहिऱ्याला काय कळणार त्यातले सुख ?

इंद्रियांचे गुलाम होऊ नका, इंद्रियांना तुमचे गुलाम करा. तुमच्या धाकात ठेवा. महा उपभोगाने तुमचे स्वत्व संपणार नाही. संत बहिणाबाई म्हणतात. सूर्य उदकात बिंबला आपण तोय तया लागून काय बाधे सूर्य स्वतःहून पाण्यात बिंबला, म्हणून काय पाणी त्याला बाधले? सूर्याचे तेज थंडावले?

जन्माला आलेल्या माणसाने विहित उपभोग घ्यावे ही नियतीची प्रेरणाच आहे. इंद्रिये, इंद्रियविषय व उपभोगाचा आनंद परस्परसंबद्ध केलेलाच आहे. फक्त तेवढेच करणे, वा त्याचा अतिरेक करणे मात्र मरणे आहे.

**– किशोर गांधी**

# विजयादशमीच्या सामूहिक सीमोल्लंघनात बडीसाजन समाज एकवटला

## १९ वर्षांची परंपरा कायम; समाजाच्या एकजुटीचे, संस्कृतीचे दर्शन

नगर – विजयादशमीच्या पर्वावर शहरातील बडीसाजन ओसवाल समाजाच्या एकजुटीचे, संस्कृतीचे आणि ज्येष्ठांप्रती कृतज्ञतेचे दर्शन घडले. श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघाच्या वतीने आयोजित सामूहिक सीमोल्लंघन व स्नेहमेळाव्यात शेकडो समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेत एकात्मतेचा संदेश दिला. गेल्या १९ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही कायम राहिली. पुरोहितांच्या मंत्रोच्चारात आपट्याच्या पानांचे व शमीचे विधिवत पूजन करून सामूहिक सीमोल्लंघन झाले. यावेळी उपस्थित नागरिकांनी एकमेकांना आपट्याची पाने देत गळाभेट घेऊन दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या तर ज्येष्ठांचे आशीर्वाद घेतले. यावेळी समाजातील १४ ज्येष्ठ नागरिकांना कृतज्ञतापूर्वक विशेष मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.



विजयादशमीनिमित्त श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या वतीने आयोजित सामूहिक सीमोल्लंघन व स्नेहमेळाव्याचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांच्या उपस्थितीत सर्व पदाधिकारी व संचालकांनी रामभक्त हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने केले.

अध्यक्ष पेमराज बोथरा यांच्या हस्ते रामभक्त हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अजित कर्नावट, सचिव विशाल शेटिया, खजिनदार मिलिंद जांगडा, सहखजिनदार दीपक बोथरा, सहसचिव अनिल लुंकड, संचालक सुमतिलाल कोठारी, धरमचंद कोठरी, नरेंद्र बाफना, राजेंद्र बोथरा, पोपटलाल कटारिया, नरेंद्र चोरडिया, राजेंद्र ताथेड पोपट लोढा, मनोज शेटिया, दीपक बोथरा, दिनेश शिंगवी, अनिल दुग्गड, सुशील भंडारी, धन्यकुमार बरमेचा, सिए मोहन बरमेचा, प्रफुल्ल चोरडिया आदींसह नागरिक, महिला व युवा व बालके उपस्थित होते.

बोथरा म्हणाले, श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ समाजाभिमुख कामातून समाजातील नागरिकांच्या उद्धारासाठी विविध योजना व उपक्रम सतत राबवत आहे. नुकतेच बडीसाजन व बोथरा परिवाराच्या संपूर्ण सहकार्याने केडगाव येथे उभारण्यात आलेल्या पारस नवजीवन घरकुल योजनाच्या इमारतीचे लोकार्पण व गरुजू कुटुंबांना मोफत फ्लॅटचे वाटप झाले आहे.

### ज्येष्ठ नागरिकांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान

प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिव विशाल शेटिया यांनी केले, उपाध्यक्ष अजित कर्नावट यांनी आभार मानले. वेदमूर्ती पंढरपूरकर गुरुजींनी सीमोल्लंघन पूजेचे पौरोहित्य केले. या स्नेह मेळाव्यात उषाबाई बांठिया, कमलबाई कुंकूलोळ, निर्मलाबाई बांठिया, पुष्पाबाई बांठिया, रमेशलाल मुथा, इचरजबाई चोरडिया. सुरेश छल्लानी व उज्वला छल्लानी, जवाहरलाल बेदमुथा व लिलाबाई बेदमुथा, अभिनंदन शिंगवी व बेबीबाई शिंगवी, चांदमल राठोड व पुष्पलताबाई राठोड आदी ज्येष्ठ नागरिकांचा सन्मानपत्र देऊन विशेष सन्मान बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. यानिमित्ताने झालेल्या नारी संमेलनातही समाजातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत पारंपरिक गरबा दांडिया व नवरात्रोत्सवाचा आनंद घेतला.




हमसफर शॉर्ट फिल्मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल उद्योजक तथा अनुष्का मोशन पिक्चर्स ॲण्ड एंटरटेनमेंटचे संस्थापक नरेंद्र फिरोदिया यांचा श्री अहमदनगर ओसवाल पंचायत सभेच्यावतीने केशरगुलाब मंगल कार्यालयात सामूहिक सीमोल्लंघन कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

# पोक्सोच्या गुन्ह्यात आरोपीला सशर्त जामीन मंजूर

नगर – समलैंगिक डेटिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या 'ग्राइंडर' ॲपच्या माध्यमातून ओळख झालेल्या तरुणाशी परस्पर संमतीने शारीरिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर, अल्पवयीन असल्याचे सांगून दाखल करण्यात आलेल्या पोक्सो कायद्यांतर्गत गुन्ह्यात आरोपी प्ररुन हजारीका याला पुणे येथील विशेष न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला आहे. पुणे येथील उंदरी परिसरातील रहिवासी असलेला आरोपी प्ररुन हजारीका याची मार्च २०२६ मध्ये एका तरुणाशी ओळख झाली होती. या ओळखीतून दोघांमध्ये प्रत्यक्ष भेटीगाठी व शारीरिक संबंध निर्माण झाले होते, मात्र नंतर फिर्यादीने भेटणे बंद केल्यानंतर २२ जून रोजी संबंधित तरुणाने स्वतःला अल्पवयीन असल्याचे सांगून कोंढवा पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात ७ जुलै रोजी अटक झाल्यानंतर आरोपीची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली होती. आरोपीच्या वतीने मूळच्या अहिल्यानगर येथील व नगर व पुणे दोन्ही जिल्ह्यांत वकिली करणाऱ्या ॲड. सिद्धी मिलिंद मोभारकर यांनी १ ऑक्टोबर रोजी पुणे येथील पोक्सो कायद्यांतर्गत विशेष न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १२ ऑक्टोबर रोजी सुनावणी झाली असता, ॲड. सिद्धी मोभारकर यांनी उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निवडक न्यायनिर्णयांचा संदर्भ देत अत्यंत प्रभावी युक्तिवाद केला आणि सरकारी पक्षाच्या युक्तिवादाला कायदेशीर आधारांवर प्रत्युत्तर दिले. ॲड. मोभारकर यांचा हा युक्तिवाद ग्राह्य धरत विशेष न्यायालयाने आरोपी प्ररुन हजारीका यास सशर्त जामीन मंजूर केला आहे.




अहिल्यानगरचा पुत्र दिशान किशोर गांधी याने कॉर्फबॉल क्रीडा प्रकारात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल ओसवाल पंचायत सभा आयोजित सीमोल्लंघन कार्यक्रमात अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान किशोर गांधी याचा सत्कार करण्यात आला.

# आठरे पाटील स्कूलच्या विद्यार्थ्यांचा शालेय क्रीडा स्पर्धेत दबदबा कायम

नगर – अहिल्यानगर शहराच्या सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेच्या विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर येथे सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या शालेय क्रीडा स्पर्धेत सुयश प्राप्त करून आपला दबदबा कायम ठेवला आहे.

मुलांच्या १७ वर्षे वयोगटात पाटील विरेन याने ५० मीटर बेस्ट स्ट्रोक जलतरण स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. मुलांच्या १७ वर्षे वयोगटात डोंगरे श्रवण याने ५० मीटर बॅक स्ट्रोक स्पर्धेत व्दितीय क्रमांक पटकावला. तसेच मुलींच्या १७ वर्षे ५० मीटर फ्रि स्टाईल स्पर्धेत विखे वेदिका व्दितीय क्रमांक तर पवार अवांतिका हिने तृतीय क्रमांक पटकावला. मुलींच्या १७ वर्षे वयोगटात ५० मीटर बॅक स्ट्रोक स्पर्धेत पवार अवांतिका हिने व्दितीय क्रमांक पटकावला.

मुलांच्या १७ वर्षे वयोगटात ४x१०० मीटर जलतरण रिले स्पर्धेत गिते नंदन, पाटील विरेन, डोंगरे श्रवण व पुंड यश यांनी प्रथम क्रमांक पटकावला. व तलवार बाजी स्पर्धेत जानवी मिसाळ व्दितीय क्रमांक तर कवडे यशांजली हिने तृतीय क्रमांक पटकावला. आणि देशमुख स्वरांजलीस सहभागी प्रमाणपत्र मिळाले. शालेय कराटे क्रीडा प्रकारात १७ वर्षाखालील खुल्या गटात ओम हिंगे याने जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण पदक पटकावले. व पुणे येथे होणा–या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. पीयुष तिजोरे ६२ कि वजन गटात द्वितीय तर श्रवण डोंगरे याने ५० कि. वजन गटात तृतीय क्रमांक प्राप्त केला शालेय कराटे क्रीडा प्रकारात १४ वर्षाखालील २२ कि. वजन गट मुलींमध्ये श्रेया कासार प्रथम तर ४४ किलो वजन गटात श्रुती भैस प्रथम सदर जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे दोन्हीही विद्यार्थिनींची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. शालेय गोळाफेक क्रीडा प्रकारात शाळेचा विद्यार्थी अथर्व गिर्जे याने सहभागी होऊन द्वितीय क्रमांक प्राप्त केला. त्याची विभागीय पातळीवर निवड झाली.

१७ वर्षाखालील मुलांच्या शालेय बॉक्सिंग स्पर्धेत तळेकर श्रीराम याने ५२ कि. वजन गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. व त्याची विभागीय पातळीवर निवड झाली. तसेच तिवटणे वरद ४६ कि. वजन गटात व भंडारे शौर्य ५२ कि. वजन गटात यांनी अनुकमे तृतीय क्रमांक प्राप्त केला.

शालेय ॲथलेटिक स्पर्धा १४ वर्षाखालील मुलींच्या २०० मी. धावण्याच्या स्पर्धेत स्वरा सोनावणे द्वितीय तर १७ वर्षाखालील मुलांच्या २०० मी. धावण्याच्या स्पर्धेत चंद अशोक याने प्रथम कमांक पटकावला. १७ वर्षाखालील मुलांच्या ४ बाय १०० रिले स्पर्धेत अशोक चंद, शौर्य भंडारी, ओम भिताडे, समर्थ तरवडे यांनी प्रथम क्रमांक मिळवून यांची पुणे येथे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या यशस्वी खेळाडूंच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद –शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना शाळेचे कीडा प्रशिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले.

# बौद्ध संस्कार संघातर्फे २५ ऑक्टोबरला वर्षावास समारोप सोहळा

नगर – बौद्ध संस्कार संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने बौद्धधर्मीय वर्षावास समारोप सोहळ्याचे आयोजन २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत चेतना लॉन्स, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. या सोहळ्यात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे, अशी माहिती बौद्ध संस्कार संघाचे भाऊसाहेब देठे यांनी दिली.

वर्षावासाच्या चार महिन्यांच्या कालावधीत 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पवित्र ग्रंथाचे वाचन व प्रबोधन करण्यात आले. या धार्मिक उपक्रमाच्या समारोप सोहळ्यास भंते धम्मपाल यांची उपस्थिती लाभणार आहे. भगवान गौतम बुद्धांचे विचार, धम्माचे महत्त्व आणि त्यातून मिळणारी मानवतावादी शिकवण यांचा प्रसार या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास वरिष्ठ रिपब्लिकन नेते, समाजभूषण (महाराष्ट्र शासन) पुरस्काराचे निर्माते काकासाहेब खंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, ते सामाजिक कार्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. तसेच सन २०२१–२२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आलेले समाजभूषण परिमल ज. निकम यांचा पुनश्च सन्मान व गौरव करण्यात येणार आहे. वरिष्ठ रिपब्लिकन चळवळीचे नेते श्रीकांत भालेराव आणि अगस्ती बनसोडे यांचीही उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमाच्या सांस्कृतिक सत्रात बाल उपासक आणि महिला उपासिका यांच्याकडून भगवान गौतम बुद्धांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. बुद्धांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग, त्यांची शिकवण आणि सामाजिक समतेचा संदेश या माध्यमातून उपस्थितांसमोर मांडण्यात येणार आहे.

धार्मिक प्रबोधनासोबतच सामाजिक बांधिलकी, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारा हा वर्षावास समारोप सोहळा होणार असून, बौद्ध बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन बौद्ध संस्कार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# राज्य केमिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक सभेसह निवडणुकीचे २३ व २४ ऑक्टोबरला शिर्डीत आयोजन

## निमगाव–निघोज येथे राज्यभरातील औषध विक्रेते एकवटणार; संघटनात्मक वाटचालीवर होणार चर्चा



महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक सर्वसाधारण सभेसह निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातील केमिस्ट भवन येथे नियोजन बैठकीसाठी अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेद्रे, खजिनदार प्रशांत उबाळे आदी.

नगर – महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक सर्वसाधारण सभेसह निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातील केमिस्ट भवन येथे नियोजन बैठक पार पडली. महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक २३ आणि २४ ऑक्टोबर रोजी 'साई पालखी निवारा', निमगाव–निघोज, शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस राज्यातील जिल्ह्यांतील सभासदांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेद्रे, खजिनदार प्रशांत उबाळे आणि सर्व जिल्हा कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ ऊर्फ अप्पासाहेब शिंदे आणि सचिव अनिल नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली ही त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. या सभेच्या नियोजनासाठी अहिल्यानगर शहरातील केमिस्ट भवन येथे आयोजित बैठकीत सभेचे नियोजन, राज्यभरातील सभासदांचा सहभाग आणि निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी अजित पारख, शशांक रासकर, चेतन कर्डिले, गणेश वाणी, भरत सुपेकर, मनिष सोमाणी, मनोज खेडकर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन ही राज्यातील औषध विक्रेते आणि औषध व्यवसायाशी संबंधित व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी संघटना आहे. या संघटनेची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा आणि निवडणूक ही राज्यातील औषध विक्रेता बांधवांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे या सभेकडे राज्यभरातील केमिस्ट बांधवांचे लक्ष लागले आहे.

या सभेमध्ये संघटनेच्या मागील तीन वर्षांतील कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच औषध व्यवसायासमोरील विविध प्रश्न, व्यावसायिक अडचणी, बदलती परिस्थिती आणि भविष्यातील आव्हाने यांवर सविस्तर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. औषध विक्रेत्यांच्या व्यवसायाशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून कोणत्या उपाययोजना करता येतील, यावरही विचारविनिमय होणार आहे.

औषध व्यवसायाचे नियमन, औषध विक्रेत्यांच्या व्यावसायिक समस्या, औषध कायद्यांमधील बदल, शासनस्तरावर प्रलंबित असलेले विविध प्रश्न आणि औषध विक्रेता बांधवांच्या हिताशी संबंधित विषय या सभेच्या केंद्रस्थानी राहण्याची शक्यता आहे. बदलत्या व्यावसायिक परिस्थितीत औषध विक्रेत्यांना भेडसावणाऱ्या अडचणींवर संघटनेने प्रभावी भूमिका घेणे, तसेच सदस्यांच्या समस्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे, याबाबतही या सभेत चर्चा होणे अपेक्षित आहे.

या सर्वसाधारण सभेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संघटनेच्या पुढील त्रैवार्षिक कालावधीसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून संघटनेच्या आगामी वाटचालीसाठी नेतृत्वाची निवड होणार असल्याने या प्रक्रियेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, प्रतिनिधी आणि सभासद या निमित्ताने एकत्र येणार आहेत. त्यांच्या सहभागातून संघटनेतील समन्वय वाढविणे, परस्पर सहकार्य अधिक दृढ करणे आणि औषध विक्रेता बांधवांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी संघटनात्मक ताकद वाढविणे, हा या सभेमागील महत्त्वाचा उद्देश आहे.

शिर्डी येथे होणारी ही त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या सभेमुळे राज्यातील औषध विक्रेता बांधवांमध्ये समन्वय, सहकार्य आणि संघटनात्मक एकजूट अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणुकीसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष, सचिव, डेलीगेट्स तसेच अल्टरनेट डेलीगेट्स मेंबर्स यांनी उपस्थित राहावे. सभेमध्ये होणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनने केले आहे.

# अहिल्यानगर येथील मनोज छाजेड यांची 'जितो पुणे चॅप्टर'च्या अध्यक्षपदी निवड



नगर – जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो)च्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी अहिल्यानगरचे पुत्र तथा उद्योजक मनोज छाजेड यांची बिनविरोध निवड झाली आहे. जितो पुणेच्या सर्वसाधारण सभेत सन २०२६–२८ या कार्यकाळासाठी नव्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मुख्य सचिवपदी जिनेंद्र लोढा यांची सर्वानुमते निवड झाली. पुणे महिला शाखेच्या अध्यक्षपदी लतिका सांखला, तर मुख्य सचिवपदी वंदना राठोड यांची निवड करण्यात आली. युवा शाखेच्या अध्यक्षपदी ऋषभ दुगड आणि मुख्य सचिवपदी स्वराज पगारिया यांची निवड झाली. या सभेला अपेक्सचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय भंडारी उपस्थित होते.

उद्योजक मनोज छाजेड हे मूळचे अहिल्यानगरचे असून व्यवसायानिमित्त पुण्यात स्थायिक झाले आहेत. पुण्यात उद्योग–व्यवसायाचा विस्तार करत असतानाही त्यांनी आपल्या जन्मभूमीशी असलेली नाळ कायम जपली आहे. संपूर्ण छाजेड परिवार धार्मिक व सामाजिक कार्याशी जोडलेला असून आचार्यश्री आनंदऋषीजी महाराज यांच्यावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. पुणे तसेच अहिल्यानगर येथील विविध सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये मनोज छाजेड नेहमीच अग्रेसर असतात. सामाजिक बांधिलकी जपत गेल्या १९ वर्षांपासून आयोजित रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे २५ हजार रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले आहे. मुळशी परिसरात वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनासाठी योगदान तसेच कोरोना काळात जितोच्या कोविड सेंटर उभारणीसाठी केलेले सहकार्य अशा विविध उपक्रमांतून मनोज छाजेड यांनी समाजसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना नुकताच 'सूर्यदत्ता बन्सीरत्न मानव सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.

मनोज छाजेड यांच्या उद्योग व बांधकाम क्षेत्रातील कामगिरीचा तसेच सामाजिक योगदानाचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. 'ड्रीम बिल्डर्स ऑफ इंडिया'चा 'विश्वकर्मा पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात आला आहे. त्यांचा 'उत्कृष्ट उद्योजक' म्हणून सन्मान करण्यात आला आहे.

रक्तदान चळवळीतील सातत्यपूर्ण योगदानाबद्दल आदिनाथ श्री संघातर्फे त्यांना 'रक्तदान प्रणेता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना 'रक्तदान महर्षी' पुरस्कार प्रदान करण्यात आला असून ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेतर्फेही त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

आधार फाउंडेशनतर्फे सन २०२३ मध्ये त्यांना उत्कृष्ट नावीन्यपूर्ण डिझाइन व बांधकामासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. तसेच 'बॉलीवूड मराठी चित्रपट व टीव्ही सीरियल'तर्फे त्यांना 'लढवय्या पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

अहिल्यानगरमधील बुरूडगाव रोड परिसरात छाजेड परिवाराने 'स्कायब्रिज' निवासी गृहप्रकल्प साकारला आहे.

# ख्रिस्ती दफनभूमीच्या समस्यांची आयुक्तांकडून पाहणी

## कामे मार्गी लावण्याचे आश्वासन; समाजाच्या निवेदनाची तातडीने दखल; स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था व संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीला प्राधान्य



ख्रिस्ती दफनभूमीच्या समस्यांची पाहणी करताना आयुक्त यशवंत डांगे. (छायाचित्र – लोकेश बर्वे)

नगर – शहरातील सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती दफनभूमीच्या दुरवस्थेबाबत सकल ख्रिस्ती समाजाच्या वतीने करण्यात आलेल्या मागणीची दखल घेत अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी दफनभूमीची प्रत्यक्ष पाहणी केली. दफनभूमीच्या समस्या जाणून घेत आवश्यक दुरुस्ती व सुशोभीकरणाची कामे मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीची संरक्षक भिंत अनेक ठिकाणी कोसळली असून, परिसरात स्वच्छतेचा अभाव आहे. तसेच मोकाट जनावरांचा दफनभूमीत प्रवेश होत असल्याने कबरींचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक वर्षांपासून बंद असलेले विद्युत दिवे, पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना अंत्यविधी तसेच धार्मिक विधी करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दोन दिवसांपूर्वी सकल ख्रिस्ती समाजाच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाची तातडीने दखल घेत आयुक्तांनी दफनभूमीला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. यावेळी उपस्थित समाजप्रतिनिधींनी दफनभूमीतील विविध समस्यांची माहिती देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

दफनभूमीतील नियमित स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बंद पडलेल्या विद्युत पोल व दिव्यांची दुरुस्ती, संरक्षक भिंतीचे बांधकाम तसेच आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आदी मागण्या समाजाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारणे, परिसरातील झाडाझुडपांची साफसफाई आणि अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करून नागरिकांसाठी सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

आयुक्तांच्या पाहणीमुळे दफनभूमीच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीला गती मिळण्याची अपेक्षा सकल ख्रिस्ती समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आली. आता प्रशासनाकडून प्रत्यक्ष कामांना कधी सुरुवात होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

यावेळी ह्युम चर्चचे रेव्ह. सनी मिसाळ, सेक्रेटरी विलास साळवे, राजू देठे, लोकेश बर्वे, सुधाकर ठोंबरे, विशाल केदारी, रमेश भोसले, संजय मकासरे, बबन निकाळजे, राहुल बनकर, राजू अगस्ती, नितीन खंडागळे, दीपक साळवे, अमोल काळे, राजेश ओहोळ, संदेश गुजराती, विक्टर पवार, राजेश उजागरे, सागर घोडके, डॅनियल काळोखे, सलोमन देठे, किरण पवार, नितीन पाटोळे आदीसह समाजातील चर्चचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# धनादेश न वटल्याने आरोपीस ३ महिन्याचा कारावास व दंड

नगर – हात उसने घेतलेल्या पैश्याच्या परतफेडीसाठी दिलेल्या धनादेश न वाटल्याने ३ महिने साधा कारावास व तीन लाख पंचवीस हजार देण्याचा आदेश अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी सचिन आर. शिंदे यांनी दिला आहे.

आरोपी वाल्मिक रामदास खडके यांना फिर्यादी यांनी उसनवारी रक्कम दिली होती. सदर रक्कम परत फेडी साठी आरोपी वाल्मिक रामदास खडके यांनी त्यांचे खाते असलेल्या बँकेचा धनादेश फिर्यादी यांच्या कडून घेतलेल्या उसनवारी रक्कमेची परतफेड करण्यासाठी दिला होता. सदर धनादेश न वटता परत आला. त्यामुळे आरोपी याने फिर्यादीस रक्कम परत न दिल्यामुळे फिर्यादी यांनी अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात वाल्मिक रामदास खडके यांच्या विरुद्ध नोगोशिएबल इंस्टुमेंट अ‍ॅक्टचे कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. सदर केसची गुणदोषावर व पटलावर आलेला साक्षी पुरावा विचारात घेवून, चौकशी होवून आरोपी वाल्मिक रामदास खडके यास कोर्टाने दोषी धरून ३ महिने साधा कारावास व ३,२५,००० नुकसान भरपाई देण्याचा आदेश पारित केलेला आहे. नुकसान भरपाई न दिल्यास एक महिना साध्या कारावासाची शिक्षा कोर्टाने ठोठावली आहे.

सदर केस मध्ये फिर्यादीच्या वतीने अ‍ॅड. वर्धमान भंडारी यांनी काम पाहिले. त्यांना सहाय्यक म्हणून अ‍ॅड. राजुल देसर्डा, अ‍ॅड. वैष्णवी दळवी, अ‍ॅड. दुर्गा शिलगे यांनी काम पाहिले.




महावीर टीव्हीएस शोरूममध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर तब्बल २०१ दुचाकींची विक्रमी विक्री झाली.

# महावीर टीव्हीएस शोरूममध्ये २०१ गाड्यांची विक्रमी विक्री

नगर – अहिल्यानगरमधील एमआयडीसी परिसरातील महावीर टीव्हीएस शोरूममध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर तब्बल २०१ दुचाकींची विक्रमी विक्री झाली असून, ग्राहकांच्या प्रतिसादामुळे शोरूममध्ये दिवसभर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. दसऱ्यानिमित्त महावीर टीव्हीएसकडून जाहीर करण्यात आलेल्या आकर्षक ऑफर्स, सुलभ फायनान्स सुविधा आणि विविध मॉडेल्सवरील विशेष सवलतींमुळे शहर व परिसरातील ग्राहकांनी वाहन खरेदीसाठी मोठी गर्दी केली होती. दसरा हा वाहन खरेदीसाठी अत्यंत शुभ मुहूर्त मानला जात असल्याने ग्राहकांचा मिळालेला विश्वास आणि प्रतिसाद आनंददायी असल्याचे सांगत ग्राहकांना उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न नेहमीच राहील, असा विश्वास शोरूमच्या संचालिका समृद्धी कटारिया यांनी व्यक्त केला.

शोरूममध्ये प्रदर्शित करण्यात आलेली टीव्हीएसची विविध मॉडेल्स, आकर्षक डिझाईन आणि आधुनिक तंत्रज्ञानाने ग्राहकांना भुरळ घातली असून, एकाच दिवसात झालेल्या २०१ गाड्यांच्या विक्रमी विक्रीने महावीर टीव्हीएसच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

# दसऱ्याच्या मुहूर्तावर नगरच्या गुलाटी मोटर्समध्ये 'अशोक लेलँड'च्या २५ वाहनांची विक्रमी विक्री

नगर – अहिल्यानगरमधील एमआयडीसी परिसरातील गुलाटी मोटर्सच्या अशोक लेलँड शोरूममध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर व्यावसायिक वाहनांच्या विक्रीने नवा उच्चांक गाठला असून, एकाच दिवसात तब्बल २५ वाहनांची विक्रमी विक्री झाल्याने शोरूममध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

दसऱ्यानिमित्त शोरूमने ग्राहकांसाठी जाहीर केलेल्या आकर्षक ऑफर्स आणि विशेष सवलतींमुळे वाहन खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी झाली होती. नवीन वाहनांची डिलिव्हरी घेत अनेक ग्राहकांनी आपल्या व्यवसायाच्या नव्या पर्वाला सुरुवात केली, तर शोरूममध्ये आलेल्या ग्राहकांचे औक्षण करून पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. अशोक लेलँडच्या वाहनांची दमदार कामगिरी, टिकाऊपणा आणि विश्वासार्हता यामुळे ग्राहकांचा वाढता कल या ब्रँडकडे दिसून येत असून, एकाच दिवसातील या २५ वाहनांच्या विक्रीमुळे आगामी काळातही विक्रीचा आलेख असाच उंचावण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



दसऱ्याला गुलाटी मोटर्स 'अशोक लेलँड'मध्ये व्यावसायिक वाहनांची खरेदी करताना ग्राहक.



पिपाडा किया शोरूममध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर ग्राहकांचा प्रतिसाद पाहायला मिळाला.

# दसऱ्याला पिपाडा किया शोरूममध्ये ५१ गाड्यांची विक्रमी विक्री

नगर – शहरातील एमआयडीसी परिसरातील पिपाडा किया शोरूममध्ये दसऱ्याच्या मुहूर्तावर ग्राहकांचा प्रतिसाद पाहायला मिळाला असून, एकाच दिवसात तब्बल ५१ गाड्यांची विक्रमी विक्री झाली आहे. ग्राहकांचा अढळ विश्वास, किया कारची क्रेझ आणि खरेदीचा उत्साह यामुळे शोरूममध्ये दिवसभर आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

दसऱ्याच्या मुहूर्तावर आपली हक्काची कार घरी नेण्यासाठी सकाळपासूनच ग्राहकांनी गर्दी केली होती. जनरल मॅनेजर संजय चक्रे आणि सेल्स मॅनेजर गणेश गांगर्डे यांच्या नेतृत्वाखाली व सहकार्यांच्या प्रयत्नांमुळे हा यशाचा नवा अध्याय लिहिला गेला. ग्राहकाभिमुख सेवा आणि आकर्षक योजनांमुळे मिळालेल्या या प्रतिसादाबद्दल व्यवस्थापनाने ग्राहकांचे आभार मानले असून, या विक्रमी विक्रीमुळे पिपाडा किया शोरूमच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# बदललेल्या जीवनशैलीमुळे हॉस्पिटल्स् बाराही महिने हाऊसफुल्ल!

## वेदमूर्ती चकोर गुरू मुळे यांचे प्रतिपादन



नगर – बदललेल्या जीवनशैलीमुळे हॉस्पिटल्स् बाराही महिने हाऊसफुल्ल असलेली दिसतात यास प्रगती म्हणायचे का? असा आत्मचिंतन करायला लावणारा सवाल वेदमूर्ती चकोर गुरू मुळे यांनी श्रोत्यांच्या पुढ्यात ठेवला.

सनातन धर्मसभेच्या शारदीय व्याख्यानमालेचे पुष्प कर्मकांड आणि ग्रहशांती या विषयावर गुंफताना ते बोलत होते. देवी शारदेच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती करून प्रवचनाचा श्रीगणेशा करण्यात आला. पौरोहित्य वेदमूर्ती उमेश वाळुंजकर आणि वेदमूर्ती बंडोपंत मुळे यांनी केले.

धर्मसभेचे मंत्री दिनकर देशमुख आणि खजिनदार उमेश नगरकर यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष हभप निळकंठ महाराज देशमुख यांनी परिचय करून दिला. विश्वस्त समीर उपाध्ये, उदय वैकर, अ‍ॅड. अच्युतराव पिंगळे, अनंतराव देशपांडे, विश्व हिंदू परिषदेचे नगर जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख तथा प्रवचनकार मिलिंद महाराज चवंडके, संतोष बारसे, श्रीमती मालतीताई मुळे, कमलताई काळे, सुनंदाताई जगनाडे, जयाताई घुटाळ, मनिषाताई दळवी, मायाताई देशमुख, सुरेखाताई देशपांडे, प्रतिभाताई मुळे, आदींसह शहराच्या विविध भागातील भाविक उपस्थित होते.

वेदमूर्ती चकोर गुरू मुळे पुढे म्हणाले, आज सर्व उत्तम सुविधा सहज उपलब्ध असताना माणूस सुख–शांती–समाधान शोधतो, ही वस्तुस्थिती आहे. विधीवत कर्माने शांती प्राप्त होते, हे लक्षात घेतले पाहिजे. प्राणायामाने शरीरातील दोष नष्ट होतात. शरीर निरोगी रहाते. मृत्यू टाळता येतो. कुलदैवत आणि कुलस्वामिनीच्या संकल्पपूर्वक पूजनाने सर्व संकटांचा परिहार होतो. इस्टेटसाठी रक्ताचे नाते तोडणारे, इतरांना त्रास देण्यात आनंद मानणारे पाहून आपल्याच दु:ख होते. शत्रू बुध्दी विनाशाय असा व्यापक विचार हिंदू संस्कृती करते.

आपल्या घराण्यातील कुलधर्म परंपरा, रूढी, रितीरिवाज अत्यंत श्रध्देने जतन करत दैनंदिन सत्कर्म करत राहिले तर आयुष्य सुकर होते.

समाजकारण, राजकारण, तीर्थयात्रा, व्यवसाय असे सर्व पातळ्यांवर काम करणारे घरातील देवांना मात्र विसरतात! दररोज आपल्या देवघरातील देवांना नैवेद्य दाखवून मगच भोजनास बसण्याची सवय घरातील सर्वांनी लावून घेवून घरातील शांती, सुखाचा मार्ग प्रशस्त झाल्याचे अनुभवावे. दैनंदिन कर्म करताना आपल्याला कोणताही दोष लागणार नाही याची काळजी घेत करा. आपण भगवंताच्या सृष्टीत रहातो, यांचे सतत स्मरण ठेवा. यज्ञयागादी सोहळ्यात सहभागी होऊन जीवनाचा आनंद घ्या, असे आवाहन करताना वेदमूर्ती चकोर गुरू मुळे यांनी यज्ञ मंडपासह शास्त्रोक्त यज्ञकुंड, स्थापित देवता, संकल्प, आवाहन, आवर्तन, पूर्णाहुती यामधील बारकावे नेमकेपणाने सांगितले. उपस्थितांना ते अधिक भावले.

# नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी माता मंदिरात नवचंडी महायज्ञ व कुमारिका पूजन



नगर – शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाइपलाइन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात नवचंडी महायज्ञ व कुमारिका पूजन धार्मिक उत्साहात झाले. नवचंडी महायज्ञातून देवीच्या शक्तिरूपाची उपासना करण्यात आली, तर कुमारिका पूजनाच्या माध्यमातून बालिकांमध्ये देवीचे रूप पाहून त्यांचा सन्मान करण्यात आला. या धार्मिक विधींमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

शारदीय नवरात्रोत्सव हा देवीच्या उपासनेचा आणि शक्तीच्या आराधनेचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. हिंदू धर्मात या उत्सवाला विशेष महत्त्व असून, नवरात्रात देवीच्या विविध रूपांची पूजा–अर्चा केली जाते. याच धार्मिक परंपरेनुसार श्री तुळजाभवानी माता मंदिरात नवचंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले. या यज्ञाच्या माध्यमातून देवीच्या शक्तिरूपाची आराधना करण्यात आली. तसेच कुमारिका पूजन करून बालिकांमधील देवीच्या स्वरूपाचा सन्मान करण्यात आला. या दोन्ही धार्मिक विधींच्या माध्यमातून श्रद्धा, भक्ती आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा संदेश देण्यात आला. देवीच्या चरणी सुख–समृद्धी, शांती आणि कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. या कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहून धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला.

या प्रसंगी धनश्री सुजय विखे पाटील, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, पुष्कर कुलकर्णी, डॉ. सागर बोरुडे, अशोक गायकवाड, बाळासाहेब पवार, ओमप्रकाश तिवारी, नगरसेविका शारदाताई ढवण यांच्यासह भाविक उपस्थित होते.



## एमआयडीसीतील कामू टाटा मोटर्सच्या दसऱ्याच्या मुहूर्तावर १०१ गाड्यांची विक्री

अहिल्यानगर शहरात दसऱ्याच्या मुहूर्तावर एमआयडीसी परिसरातील कामू टाटा मोटर्सच्या शोरूमने एकाच दिवशी तब्बल १०१ गाड्यांची विक्री करून विक्रम प्रस्थापित केला आहे. दसऱ्याच्या पर्वावर नवीन वाहन खरेदी करण्यासाठी ग्राहकांमध्ये उत्साह दिसून आला असून सकाळपासूनच शोरूममध्ये ग्राहकांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची गर्दी झाली होती. आकर्षक ऑफर्स, जुन्या गाड्यांसाठी एक्स्चेंज सुविधा आणि सुलभ कर्जपर्याय उपलब्ध करून दिल्याने वाहन खरेदीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकाच दिवशी झालेली १०१ गाड्यांची ही विक्री म्हणजे केवळ आकड्यांचा विक्रम नसून ग्राहकांनी कामू टाटा मोटर्सच्या दर्जेदार सेवांवर दाखवलेल्या भक्कम विश्वासाची पावती आहे. या अभूतपूर्व यशामुळे दसऱ्याच्या मंगलमय दिवशी शोरूम परिसर ग्राहकांच्या गर्दीने फुलून गेला होता.

# तुळजाभवानी माता मंदिरात रावण दहन



नगर – दसरा सणानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिर देवस्थानच्या वतीने रावण दहन सोहळा झाला.

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते रावण दहन करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी सभागृह नेते रवींद्र बारस्कर, निखिल वारे, करण कराळे, सोमनाथ जाधव, युवराज चव्हाण, पुष्कर कुलकर्णी, संपत नलावडे, राहुल जामगावकर, प्रा. अशोक साबळे, रोहन सानप, अशोक गायकवाड, सुधीर लांडगे, राजेंद्र पाचे, प्रशांत भालेराव, ओमप्रकाश तिवारी, नवनाथ आंधळे, स्मिता शितोळे, दत्तात्रय तांबे, सागर पुंड, भगवान राऊत, सुनीता कानडे, लतिका पवार यांच्यासह भाविक उपस्थित होते.

# कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज पुण्यतिथीनिमित्त २५ ऑक्टोबरला नगरमध्ये को जागर्ति प्रवचन सेवा

नगर – श्री क्षेत्र सोनई येथील कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी कृष्णानंद आयुर्वेदालयाच्या वतीने २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता को जागर्ति या प्रवचन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.

दादेगाव येथील श्री देवदास स्वामी मठाचे, समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी हे यावेळी प्रवचनातून भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच श्री क्षेत्र सोनई येथील श्री रेणुका दरबार येथून यज्ञेश्वर महाराज, छत्रपती संभाजीनगर येथून श्री हरिहर सद्गुरु शक्तिपीठ येथील अंबरीश महाराज तथा अनिरुद्ध महाराज यांची उपस्थिती कार्यक्रमाचे प्रसंगी असणार आहे. हा कार्यक्रम पालवी शिशु विहार, शुभमंगल कार्यालय, सावेडी नाका येथे होणार आहे.



संतांचे चरित्र आणि त्यांच्या विचारांचा अभ्यास प्रत्येक व्यक्तीने करणे आवश्यक आहे, असे शास्त्र सांगते. शरीर, मन आणि बुद्धी यांच्याही पलीकडे जाऊन केलेले अध्यात्म चिंतन उत्तम आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. आधुनिक संशोधनातूनही अध्यात्म चिंतनाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. आयुर्वेदानुसारही अध्यात्म चिंतन ओजवर्धन करणारे मानले गेले आहे. त्यामुळे सकारात्मक विचार, मानसिक स्वास्थ्य आणि जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी अध्यात्म चिंतन महत्त्वाचे ठरते.

कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या नावाने सुरू झालेले स्वामी कृष्णानंद आयुर्वेदालय आयुर्वेद सेवेच्या माध्यमातून कार्यरत आहे. या आयुर्वेदालयाच्या वतीने अध्यात्म चिंतनरूपी औषध समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या प्रवचन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री समर्थ भक्त मंदार बुवा रामदासी यांच्या प्रवचनातून संतविचार आणि अध्यात्माचे महत्त्व उलगडले जाणार आहे. या प्रवचन सेवेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी कृष्णानंद आयुर्वेदालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# धम्माल मनोरंजन



कुठल्याही कलासाधनेत तल्लीन होणे म्हणजे निरामय आनंद लुटणे होय.

सुविचार

करुन घ्यावी. थोडेसे पाणी व चिंच पातेल्यात घेऊन गॅसवर उकळून घ्यावे. नंतर त्याचा कोळ काढून त्यात गूळ, धने, जिरे, तिखट, मीठ, खजुराची पेस्ट, व्हिनेगर घालून चांगले हलवून बाटलीत भरुन ठेवावे. फ्रीजमध्ये ठेवल्यास जास्ती दिवस टिकते.

## दिनविशेष २३ ऑक्टोबर

१७०७: ग्रेट ब्रिटनची पहिली संसदेची बैठक.
१८५०: अमेरिकेत पहिले राष्ट्रीय महिला हक्क संमेलन सुरु झाले.
१८९०: हरी नारायण आपटे यांनी करमणूक या आपल्या साप्तहिकातून स्फूट गोष्टी लिहिण्यास प्रारंभ केला आणि मराठी लघुकथेचा पाया घातला गेला.
१९४४: दुसरे महायुद्ध सोविएत लाल सैन्याने ( ) हंगेरीत प्रवेश केला.
१९७३: संयुक्त राष्ट्रांनी ( ) निर्बंध घातल्यामुळे इस्त्रायल व सीरीयामधील युद्ध संपुष्टात आले.
१९९७: सामाजिक कार्यासाठीचे जर्मनीचे योजेफ ब्यूज पारितोषिक किरण बेदी यांना प्रदान.२३ ऑक्टोबर जन्म
१७७८: कित्तूरची राणी चन्नम्मा यांचा जन्म. (मृत्यू: २१ फेब्रुवारी १८२९)
१८७९: वैदिक धर्माचे पुरस्कर्ते शंकर रामचंद्र तथा अहिताग्नी राजवाडे यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९५२)
१९००: इंग्लिश क्रिकेटपटू डग्लस जार्डिन यांचा जन्म. (मृत्यू: १८ जून १९५८)
१९२३: श्री विद्या प्रकाशन चे संस्थापक दामोदर दिनकर तथा मधुकाका कुलकर्णी यांचा जन्म. (मृत्यू: २२ फेब्रुवारी २०००)
१९२३: भारतीय–पाकिस्तानी भाषाशास्त्रज्ञ, लेखक आणि विद्वान असलम फारुखी यांचा जन्म. (मृत्यू: १५ जुन २०१६)
१९२४: संगीतकार, गायक व नट संगीतभूषण पं. राम मराठे यांचा जन्म. (मृत्यू: ४ ऑक्टोबर १९८९)
१९३७: भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते देवेन वर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर २०१४)
१९४०: ब्राझिलियन फुटबॉल खेळाडू पेले यांचा जन्म.
१९४५: अभिनेते व नाट्यनिर्माते शफी इनामदार यांचा जन्म. (मृत्यू: १३ मार्च १९९६)
१९७४: भारतीय पत्रकार आणि लेखक अरविंद अडिगा यांचा जन्म.
मृत्यू१९१०: थायलँडचा राजा चुलालोंगकोर्ण तथा राम (पाचवा) यांचे निधन. (जन्म: २० सप्टेंबर १८५३)
१९१५: इंग्लिश क्रिकेटपटू डब्ल्यू. जी. ग्रेस यांचे निधन. (जन्म: १८ जुलै १८४८)
१९२१: चाकाच्या आत हवा भरलेली नळी () वापरण्याच्या तंत्राचा शोध लावणारे स्कॉटिश संशोधक तसेच डनलॉप रबर चे संस्थापक जॉन बॉईड डनलॉप यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १८४०)
१९५७: ख्रिश्चन डायर एस.ए. चे संस्थापक ख्रिश्चन डायर यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १९०५)
२०१२: बंगाली कवी व कादंबरीकार सुनील गंगोपाध्याय यांचे निधन. (जन्म: ७ सप्टेंबर १९३४)
१९४३: २१वे योकोझुना, जपानी सुमो वाकाशिमा गोंशिरो यांचे निधन (जन्म: १९ जानेवारी १८७६)

## महाशब्दकोडे



### उभे संकेत

१) फक्त एक वेळा
२) हात, टॅक्स
३) अंतरणे, हानी पावणे
४) एक पातळ खाद्य
६) वचनाची पूर्ती तोडणे, दिलेला शब्द न पाळणे
७) मोठा आवाज
८) विजया दशमी
१२) दिलेला शब्द
१३) सागाची एक जात
१५) स्पष्ट, उजेड
१९) बांधकाम २०) धडक
२१) खोड, दुर्गुन
२२) एक फूलझाड
२३) दगडकाम करणारी एक जात
२४) एक खाद्य २५) अस्थिर
२८) बसताना आलेली निद्रा
३१) विष ३३) झुकविणे
३५) श्रावण शु.१५
३६) पंच, अडत्या
३७) अक्षिदा वाटण्याचे ठिकाण
३९) मधोमध
४०) हृदय, इच्छा
४५) मूळाक्षरे ४६) मजूर
४७) एक प्राणी
४८) नजर ठेऊन
५०) लवकर न तुटणारा
५१) इंग्रजीत थंड
५२) वेळू
५३) एक धूप द्रव्य

### आडवे संकेत

१) एकाचाच कारभार
५) नेहमी खोटे बोलणारा
९) कुरकुर, भांडण
१०) एक मादक द्रव्य
११) स्वावलंब पाळणारा
१४) मासा, एक रास
१६) खो- खोच्या खेळात उठ म्हणण्याचा शब्द
१७) व्यभिचारी
१८) लाट, नाश, मोड
२०) डोक्यावर केस नसणे
२२) वरपक्षांना विश्रांतीसाठी दिलेली जागा
२४) देव, ईश्वर २६) मिळकत
२७) दुरुस्ती
२९) याचा गोंद होतो
३०) एक अरबी महिना
३२) जुवा खेळणारा
३४) कामाची इच्छा धरुन असलेला
३५) एक आडनाव
३६) रेषा, रेखा
३८) पुढे, नंतर
३९) प्राणावरील संकटात अविचाराने शिरकाव
४१) पती मरण पावलेली
४२) रत्न, माळेतला गोलक
४३) पुंगळी ४४) एक वनस्पती
४६) घिरटी, उडी
४९) एक मराठी महिना
५०) विष्णूचा एक अवतार
५१) हिशेब ठेवणारा पाटलाचा अधिकारी५२) वायु, हवा
५४) माहिती असलेला
५५) वाईट सवय
५६) हिंस्त्रपणा सोडलेला
५७) भिती

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ए | क | ना | थ | सू | र्या | जी | पं | त | कु | ळ | क | र्णी |
| क | | र | | र | | | ढ | ग | | | र्त | |
| ता | क | द | | दा | रो | दा | र | | अ | प | व्य | य |
| | र | | म | स | | | पु | त्र | | सा | द | |
| गुं | ता | गुं | त | | आ | चा | री | | वा | | क्ष | य |
| जा | | गा | | मा | द | क | | मो | चा | | | मी |
| र | स | रा | ज | | ळ | | सु | का | ळ | | सु | |
| व | न | | ना | | आ | सा | म | | पं | च | धा | तु |
| | क | ड | बा | | प | व | न | | च | | क | |
| शा | | बा | ई | बा | ट | ली | | | वि | शा | र | द |
| र | म | | | रा | | | पा | व | शी | | | शा |
| दा | न | व | | ख | डी | सा | ख | र | | आ | न | न |
| | पा | ट | व | डी | | क | र | | | | व | न |




१) भारतात बौद्धांची एकूण ९०० लेणी आहेत. त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात किती लेण्या आहेत?
अ)६५० ब)७०० क)८०० ड)६००

२) राज्यात सर्वाधिक म्हणजे ३४ शहरे कोणत्या जिल्ह्यात आहे?
अ)पुणे ब)औरंगाबाद क)अहमदनगर ड)ठाणे

३) जळगाव खानदेशात कापुस जास्त होतो तरी कापडगिरण्या मात्र मुंबईत जास्त आहेत?
अ)बंदर असल्याने ब)दमट हवामानामुळे
क)बाजारपेठ असल्यामुळे ड)कामगारांच्या विपुलतेमुळे

४) भारतीय विद्याभवन मंडळ कोठे आहे?
अ)पुणे ब)मुंबई क)नाशिक ड)नागपूर

५) महाराष्ट्रातील कोणत्या भागात धरण बांधणे शक्य नाही?
अ)नैऋत्य ब)आग्नेय क)वायव्य ड)ईशान्य

६) रोजगार हमी योजना कायद्याने केव्हा सुरु झाली?
अ)१९७२ ब)१९७८ क)१९९८ ड)१९७६

७) क्षेत्रफळाने सर्वात मोठा प्रादेशिक विभाग कोणता?
अ)विदर्भ ब)मराठवाडा क)प. महाराष्ट्र ड)कोकण

८) विडी उद्योगासाठी प्रसिद्ध ठिकाण कोणते?
अ)सिन्नर ब)जळगाव क)डहाणू ड)हिंगोली

९) एक पाण्याची टाकी एका नळाने ८ तासात भरते तर दुसऱ्या नळाने ४ तासात रिकामी होते, दोन्ही नळ एकाच वेळी चालू केले, तर भरलेली टाकी किती तासात रिकामी होईल?
अ)६ ब)४ क)८ ड)५

१०) एक मोटार निर्धारित अंतर १० तासांत कापते. जर ती अर्धे अंतर ताशी ४० किमी वेगाने व उरलेले अंतर ताशी ६० किमी वेगाने कापते, तर त्या मोटारीने एकूण किती किमी प्रवास केला?
अ)४२० किमी ब)४०० किमी
क)२४० किमी ड) ४८० किमी

११) खनिज खतांच्या उत्पादनात खालीलपैकी काय विशेष उपयुक्त ठरते?
अ)पोटॅशियम नायट्रेट ब)सोडियम क्लोराईड
क)नायट्रिक आम्ल ड) सल्फुरिक आम्ल

१२) बंचीहॉप हा रोग कशावर आढळतो?
अ)आंबा ब)केळी
क)अननस ड)डाळींब

१३) एका वृत्तचितीच्या तळाची त्रिज्या २१ से.मी. व घनफळ १३८६० घनसें.मी. आहे तर तिची उंची किती?
अ)१८ सेमी ब)१२सेमी
क)१० सेमी ड)६ सेमी.

१४) रेणुमधील अणुमध्ये असणाऱ्या ..... ते जखडलेले राहतात?
अ)रासायनिक बंध ब)गुरुत्वाकर्षण
क)ऊर्जा पातळी ड) संयुजा इलेक्ट्रान

१५) पंडित भिमसेन जोशी भारतातील कुठल्या गायण घराण्याचे मानले जातात?
अ)कर्नाटकी ब)डागर
क)किराना ड)जयपूर

१६) महाडचे चवदार तळे सर्वांना खुले व्हावे या प्रश्नावर कोर्टबाजी होवून कोर्टाच्या आदेशाप्रमाणे हे तळे सर्वांना .......... मध्ये खुले झाले?
अ) १९५६ ब)१९३७ क) १९४५ ड) १९३०

१७) विद्येविना मती गेली, मतिविना नीती गेली........ अशा प्रकारचे विद्येचे महत्त्व महात्मा फुल्यांनी कोणत्या ग्रंथात नमूद केले आहे?
अ) गुलामगिरी ब) इशारा
क) शेतकऱ्यांचा आसूड ड) ब्राम्हणाचे कसब

१८) १८७६- ७७ मध्ये पडलेल्या भयानक दुष्काळाला वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्यांना एकत्रित करुन महात्मा फुल्यांनी एक बंड केले?
अ) दुष्काळग्रस्ताचे बंड ब) खतफोडीचे बंड
क) दलीतांचे बंड ड) शेतकऱ्यांचे बंड

उत्तर: (१-क), (२-अ), (३-ब), (४-ब), (५-ड),(६-ब), (७-अ), (८-अ), (९-क), (१०-ड), (११-क) , (१२-ब), (१३-क), (१४-अ), (१५-क), (१६-ब ), (१७-क), (१८-ब ).



## फिल्मी शब्दकोडे



### आडवे संकेत

१) अर्जून रामपाल और ऐश्वर्या रॉय की फिल्म. ३) कम्पनी इस फिल्म में खल्लास गाने पे नाचनेवाली नायीका. ६) सन् १९९८ में रामगोपाल वर्मा की इस फिल्म में डी.के. चक्रवर्ती, उर्मिला मातोंडकर थे. ७) आप जैसा कोई मेरे जिंदगी में आये तो... यह कुर्बानी इस फिल्म का गाना इस गायीका ने गाया है.

१२) सन १९९५ में बनी क्रिमीनल इस फिल्म की नायीका. १४) सन १९९६ में राज कंवर के निर्देशन में बनी इस फिल्म में सलमान खान, करिश्मा कपूर, सनी देओल थे. १६) याद आ रही है तेरी याद आ रही है.... यह लव्हस्टोरी इस फिल्म का गाना इस गायक ने गाया है. १९) अक्षय कुमार, करिना कपुर, सुरेश ओबेरॉय, राजबब्बर और आशिष विद्यार्थी अभिनीत एक फिल्म.

२०) XX सरदेसाई (गायीका)
२१) XX मिश्रा (सहनायीका)
२२) XXXX है प्यार का (फिल्म)
२५) रजनीगंधा इस फिल्म की नायीका. २६) सन् २००२ में बनी इस फिल्म में बिपाशा बासू और डिनो मोरीया थे. २७) सन् १९९४ में महेश भट्ट की इस फिल्म में अतुल अग्निहोत्री, सोनाली बेंद्रे, मिथून चक्रवर्ती थे. २९) सन् १९९९ में ज्योतिन गोयल के इस फिल्म में संजय दत्त और जुही चावला थे.
३०) झुले झुलेलाल दम मस्तकलंदर सेवन ही सरकार दम मस्तकलंदर..... यह गाना इस फिल्म का है. ३२) दिल क्या (फिल्म) ३५) मै प्यार का पुजारी मुझे प्यार चाहिऐ... यह गाना इस फिल्म का है. ३६) सन् १९९७ में राजीव बब्बर के इस फिल्म में जैकी श्रॉफ, रमैय्या, मिथून चक्रवर्ती थे. ३७) सन् १९८९ में राजकुमार कोहली के इस फिल्म में मिथून चक्रवर्ती, मिनाक्षी शेषांद्री और डिम्पल कपाडिया थे.

### उभे संकेत

१) आवारा पागल XXX (फिल्म)
२) सन् १९८१ में टिनु आनंद के इस फिल्म में अमिताभ बच्चन, परवीन बॉबी, अमजद खान थे. ४) इस फिल्म में कुलभुषन खरबंदा का नाम शाकाल था. ५) XXX सुल्तान (फिल्म) ६) हम दिल दे चुके XXX (फिल्म) ८) सन् १९८१ में लावारीस इस फिल्म की नायीका.
९) सन् १९९५ में कुक्कु कोहली के इस फिल्म में अजय देवगन, तब्बू थे. १०) XX मंगेशकर (गायीका)
११) अभिषेक बच्चन, हृषीता भट्ट, दारासिंह अभिनीत एक फिल्म.
१३) सन् १९९७ में निर्माता राकेश रोशन के इस फिल्म में शाहरुख खान, माधूरी दीक्षीत थे.
१५) सोनु निगम की एक फिल्म.
१७) सारी दुनिका का बोझ हम उठाते है, लोग आते है लोग जाते है... यह गाना इस फिल्म का है.
१८) प्रतिभा सिन्हा की नायीका माँ.
२३) सन् १९९९ में श्रीकांत शर्मा के इस फिल्म में अक्षय खन्ना, मनिषा कोईराला थे.
२४)XX मुनीम (नायीका) २५) सन् १९९४ में फरोग सिद्दीकी के इस फिल्म में अजय देवगन और तब्बू थे.
२६) सन् १९९५ में निर्माता प्रेम लालवानी के इस फिल्म में शाहरुख खान, मनिषा कोईराला थे. २८) XX कपूर (नायक/निर्माता) ३१) मंजीले अपनी जगह है रास्ते अपनी जगह.... यह गाना इस फिल्म का है. ३३) अपून बोला तु मेरी लैला.... यह शाहरुख खान ने गाया गीत इस फिल्म का है.
३४) युक्ता मुखी की पहली फिल्म.
३५) XX कर दी आपने (फिल्म)

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ज | न | | श | शी | क | पू | र | | | मी | त |
| य | | | मि | रा | | | | | | अ | ना | डी |
| रा | | अ | | बी | वी | हो | तो | ऐ | सी | | | पा |
| बा | द | ल | | | | ते | | श्व | | कि | शो | र |
| नो | | बे | ता | ब | | हो | | र्या | | | ला | |
| | लै | ला | | स | | ते | | रा | | | औ | र |
| | | | कि | | | प्या | | य | ल | गा | र | |
| | श | र्मि | ला | टै | गो | र | | | | | श | स्त्र |
| | र | | | | | हो | | | सा | हि | ब | |
| ह | द | | जा | | आ | ग | ही | आ | ग | | न | ही |
| | क | | ने | | | या | | स | र | ग | म | |
| | पु | न | म | ढि | ल्लो | | | पा | | ज | | |
| | र | | न | | | वि | रा | स | त | | | |

### विनोद



कजूषशट्या मुलगा-
बाबा, मी आज बसमागे धावून १५ पैसे वाचविले.
कंजूषशेट-मूर्खा! टॅक्सीमागे का नाही धावलास? पाच रुपये तरी वाचले असते!

-----------

शेजारीन- तुमचा पिंटू वाईट शिव्या देतो.
पिंटूची आई- जाऊ द्या हो! अजून लहान आहे तो!
तो मोठा झाला की चांगल्या चांगल्या शिव्या देईल!

### चारोळी

जन्मानंतर मृत्यु हा
अटळच असतो,
म्हणूनच आनंदान सामना
त्याचाही करायचा असतो.

# महावितरणच्या अवाजवी वीजबिलांविरोधात निदर्शने

## राहुल आढाव यांचे उपोषण; सोलर बँक युनिटस्चा मागितला हिशोब

नगर – मंजूर सौर ऊर्जा क्षमता वाढीची नोंद प्रणालीमध्ये अद्ययावत न केल्याने तसेच चुकीच्या नोंदींमुळे अवाजवी वीजबिले आकारली जात असल्याचा आरोप करत महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने निदर्शने करण्यात आली. या प्रकरणातील तक्रारदार राहुल आढाव यांनी २१ ऑक्टोबर रोजी शहरातील महावितरण विभागीय कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. मंजूर पाच किलोवॅट सौर क्षमतेची अधिकृत नोंद करून सुधारित वीजबिल द्यावे, मागील दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा हिशोब करावा आणि सुरक्षा ठेवेसंदर्भातील नोंदी दुरुस्त कराव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात कारभारी गवळी, अशोक सब्बन, राहुल आढाव, आनंदा आढाव, वीर बहादूर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बाळासाहेब पालवे, ऋषिकेश आढाव आदी सहभागी झाले होते.



मंजूर सौर ऊर्जा क्षमता वाढीची नोंद प्रणालीमध्ये अद्ययावत न केल्याने तसेच चुकीच्या नोंदींमुळे अवाजवी वीजबिले आकारली जात असल्याचा आरोप करत महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

आढाव यांनी आपल्या घरावरील मूळ तीन किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा यंत्रणेत अतिरिक्त दोन किलोवॅटची वाढ मंजूर करून घेतली होती. त्यामुळे त्यांच्या सौर यंत्रणेची एकूण मंजूर क्षमता पाच किलोवॅट झाली होती. मात्र, महावितरणचे कर्मचारी, अधिकारी आणि संबंधित व्हेंडर यांच्या निष्काळजीपणामुळे ही वाढ वीज वितरण प्रणालीमध्ये वेळेत अद्ययावत करण्यात आली नाही, असा आरोप करण्यात आला आहे. या चुकीच्या नोंदींमुळे मंजूर पाच किलोवॅट क्षमतेऐवजी दोन किलोवॅट सौर क्षमता नोंदविण्यात आली. परिणामी, मागील दीड ते दोन वर्षांतील सोलर बँक युनिट्सचा अपेक्षित लाभ मिळाला नसल्याचे आढाव यांचे म्हणणे आहे. याशिवाय, ग्राहकाची सुरक्षा ठेवही वीजबिलात समायोजित करण्यात आली असून अवाजवी बिले पाठविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकरणात आढाव यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत (आरटीआय) संबंधित माहिती मागविली होती. मात्र, उपविभागीय कार्यालयाकडून अपूर्ण उत्तरे देण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही प्रश्न मार्गी लागत नसल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

### प्रश्न केवळ एका वीज ग्राहकापुरता मर्यादित नाही

यावेळी कारभारी गवळी यांनी हा प्रश्न केवळ एका वीज ग्राहकापुरता मर्यादित नसून स्वतःच्या घरावर सौर ऊर्जा यंत्रणा बसवून वीज निर्मिती करणाऱ्या देशभरातील ग्राहकांशी संबंधित असल्याचे सांगितले. सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर व्हावा, यासाठी सरकारने धोरणात्मक बदल करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारतामध्ये वर्षातील बहुतांश काळ सूर्यप्रकाश उपलब्ध असतो. त्यामुळे सौर ऊर्जेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होऊ शकते. या ऊर्जेचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळावा, यासाठी सौर ऊर्जा धोरण अधिक लोकाभिमुख करावे, अशी मागणी त्यांनी केली.

## गुरुवाणी – ८८
## शुभंकर बना...



तीर्थंकर भगवान महावीर यांची सर्वात मोठी विशेषतः आहे की, त्यांनी जीवनाकडे क्षणिक म्हणून नाही पाहिले. जीवनाचे शाश्वत स्वरूप पाहिले. जगात मृत्यूच्या कलेवर खूप संशोधन होत आहे. कसा वेदना मुक्त अंतिम श्वास हवा यावर संशोधन केले जात आहे. मनुष्य जीवनाच्या शिखरावर हसतमुखाने कसे जायचे हे जिन शासन सांगते. पुण्यशाली पवित्र आत्म्याची अंतिम साधना प्रसन्न असते. ती संयत आणि समृद्ध असते. काही असे पण गृहस्थ असतात ज्यांचे जीवन साधूंपेक्षाही श्रेष्ठ असते. बाह्य क्रिया तुम्हाला नरकापासून वाचवू शकत नाही. तुमचे व्रत,आचरण कल्याणकारी असेल तरच तुम्ही देवगतीत जाल. तुम्ही गृहस्थ असाल तर सामायिक करा,पौषध करा, जर मुनी असाल तर अंतर्बाह्य मुनी बना. अंतिम समयी संत्रस्त नसलं पाहिजे. स्वतःला प्रसन्न ठेऊन देहापासून मुक्त होता आले पाहिजे. छोट्या निर्णयातून मोठा रिझल्ट मिळवता येतो. जगात सगळ्यात मोठा आजार फैलावत आहे, तो म्हणजे चिंता आणि नैराश्य. त्यांना कोणतीही शारीरिक वेदना नसते पण मनाने दुःखी असतात. सत्याचा शोध घेणारे जेव्हा मैत्री भाव ठेवतात तेव्हा ते शास्त्राला जन्म देतात. वैरभाव असेल तर शस्त्र निर्मिती होईल. परमात्मा सांगतात, सत्य शोधताना मित्र बनून शोधा. मैत्रीभाव नसेल तर सत्य भयंकरच दिसेल. सत्य बोलताना नेहमी तपासून घ्या, मनात मैत्री भाव आहे की वैर भाव? सत्य कटू नसते. तीर्थंकरांनी सत्य म्हणजे भगवान असे म्हटले आहे. भगवान कधी कटू नसतात. 'सत्यम् शिवम् सुंदरम्'. प्रतिशोधाची भावना असेल तर सत्य कटू होते. अशा वेळी स्वतःला सावरले पाहिजे. स्वतःमध्ये सत्याचा शोध घेता तेव्हा कल्याण होते. नात्यांशिवाय तुम्ही जगू शकत नाही हे सत्य आहे. परंतु नात्यांना सीमा असते. ते मजबुरी नसतात. ते गुलाम बनवण्याठी नाहीत. हे कळले तरच तुम्ही पुढे जाऊ शकाल. भीती आणि वैरापासून दूर जात शुभंकर बना. जे दिले गेले ते सेवन करा. आताच्या काळात बुफे पद्धत आहे. आपल्या हाताने घेऊन खाल्ले जाते. घरात कोणी तरी वाढलेल्या भोजनाचा आनंद वेगळा असतो. परमात्मा सांगतात, एकदा श्रेष्ठ बनण्याचे लक्ष्य ठेवले तर कधीच स्वतःशी तडजोड करू नका. कर्म क्षय करण्यासाठी पुरूषार्थ करा. मनासाठी ओझे बनणारे विचार झटकून पुढे चला.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक आकाशकंदील तयार केले.

# शालेय विद्यार्थ्यांनी तयार केले पर्यावरण पूरक आकाशकंदील

नगर – स्वच्छ भारत, सुंदर भारत... प्लास्टिक मुक्त भारत या संकल्पनेतून न्यू इंग्लिश स्कूल वाकोडी ता. नगर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जुन्या वह्यांचे पुठ्ठे, जुने कॅलेंडर, जुन्या लग्न पत्रिका, बांबूच्या काड्या, लेस, काचेच्या टिकल्या, चहाचे पेपर ग्लास, इत्यादी टाकाऊ वस्तू पासुन तसेच घोटिव कागद नैसर्गिक रंगाचा उपयोग करून पर्यावरण पूरक आकाश कंदिल बनवले. यामध्ये कुठेही प्लास्टिक व थर्माकॉल चा वापर केला नाही. पर्यावरण पूरक आकाशकंदिल बनवा उपक्रमात विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आवडीने सहभाग घेतला.

या उपक्रमा बद्दल विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती शकुंतला शरदराव तोडमल, सचिव आबासाहेब तोडमल व मुख्याध्यापक कराळे विजय यांनी कौतुक केले. तसेच या उपक्रमाच्या यशस्वीते साठी विद्यालयातील शिक्षक घालमे दादा, गायकवाड उमेश, बाबळे एकनाथ, श्रीमती मोढवे राणी, सौ. कर्पे शर्मिला, अविनाश येरकल, प्रफुल्ल सुर्यवंशी, हराळे योगेश यांनी सहकार्य केले.

# दुष्काळी परिस्थितीत कर्जवसुलीला स्थगिती द्या अन्यथा 'जागरण–गोंधळ आंदोलना'चा इशारा

नगर – जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीला स्थगिती देण्यात यावी, तसेच वसुलीसाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा वापर करून नागरिकांवर दहशत निर्माण करणे आणि मारहाण करून सक्तीने वसुली करण्याचे प्रकार थांबवावेत, अन्यथा २६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण–गोंधळ आंदोलन करण्यात येईल असा इशारा अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

वसुलीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) नियमांनुसार अधिकृत एजंटांची नियुक्ती करावी, तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात कर्जवसुलीच्या नावाखाली होणाऱ्या कथित गुन्हेगारी प्रकारांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही संघटनेने केली आहे. या मागण्यांचे निवेदन छावा संघटनेच्या वतीने नाशिक विभागीय आयुक्तांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाप्रमुख विनोद साळवे तसेच संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



फायनान्स कंपन्यांकडून वसुलीसाठी अनधिकृत एजंटांची नियुक्ती केली जात असून, काही ठिकाणी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा वापर केला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. अशा व्यक्तींच्या माध्यमातून नागरिकांवर दबाव आणणे, दहशत निर्माण करणे आणि मारहाण करून सक्तीने पैशांची वसुली करण्याचे प्रकार घडत आहेत. शहरातील चौकाचौकांत वसुली एजंटांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा दावा संघटनेने केला असून कर्जवसुलीच्या नावाखाली कायदा हातात घेणाऱ्या व्यक्तींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

फायनान्स कंपन्यांनी कर्जवसुलीसाठी एजंटांची नियुक्ती करताना भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांचे पालन करावे. संबंधित एजंटांची पार्श्वभूमी तपासून आणि पोलीस पडताळणी करूनच त्यांची नियुक्ती करण्यात यावी. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना वसुलीच्या कामावर नेमले जाऊ नये, अशी मागणी संघटनेने केली आहे. दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी कर्जवसुलीला स्थगिती देण्यासह अनधिकृत वसुली एजंटांचा बंदोबस्त करण्याच्या मागण्या प्रशासनाने गांभीर्याने घ्याव्यात, असे आवाहन अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेने केले आहे.

या मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास २६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण–गोंधळ आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.


**महाराष्ट्र शासन,**
**सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, नाशिक**
दुरध्वनी क्रमांक ०२५३–२५७८०१२ mahapwd.gov.in/https://pay to pwd

**निविदा सुचना क्रमांक /२१/ सन २०२६–२७**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता सा.बां.विद्युत विभाग नाशिक दुरध्वनी क्रमांक ०२५३–२५७८०१२ हे खालील संकेतस्थळावर नमुद केलेल्या ब–१ नमुन्यातील निविदा गेट वे पेमेंट निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडुन निविदा मागवित आहेत.
वरील निविदेत ६३ कामे समाविष्ट असून या निविदेवरील संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे.
www.mahapwd.gov.in
https://paytopwd.com
या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांनी नोंद घ्यावी.
जा.क्रकाअना/निविदा–२/१६४१/ सन २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विद्युत विभाग, ग्रीन बिल्डींग,
२ रा मजला. उंटवाडी रोड, सा.बां. परिसर, नाशिक.
E-mail-elnashik.ee@mahapwd.gov.in
दिनांक :- १३/१०/२०२६

**कार्यकारी अभियंता**
सा.बां. विद्युत विभाग, नाशिक.


# शेवग्याच्या झाडामध्ये केली गांजाची लागवड

**पोलिसांनी छापा टाकत दोन आरोपींसह सव्वापाच किलो गांजा केला जप्त**

नगर – नगर तालुक्यातील इमामपूर येथे झेंडूच्या शेतात अंमली पदार्थ असलेल्या गांजाची लागवड उघडकीस आणल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आणखी एक असाच प्रकार उघडकीस आणला आहे. नेवासा तालुक्यातील वाटापूर येथे शेवगा पिकाच्या झाडामध्ये लपवून करण्यात आलेल्या गांजाच्या अवैध लागवडीवर छापा टाकून पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ५ किलो १० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्यासाठी एक पथक तयार केले होते. २१ ऑक्टोबर रोजी हे पथक सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना, वाटापूर गावात रखमाजी कुशाबा आयनर याने जमीन वाट्याने घेऊन शेवगा पिकाच्या झाडामध्ये गांज्याच्या झाडांची लागवड केल्याची गोपनीय माहिती मिळाली.



स्थानिक गुन्हे शाखा आणि सोनई पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने पंचासमक्ष संबंधित शेतात छापा टाकला. पाहणी केली असता शेवगा पिकामध्ये गांज्याची लहान–मोठी झाडे आढळून आली. यांप्रकरणी पोलिसांनी रखमाजी कुशाबा आयनर (वय ८१, रा. वाटापूर, ता. नेवासा) आणि सोपान गुजाबा रूपनर (वय ४६, रा. अंमळनेर, ता. नेवासा) या दोघांना ताब्यात घेतले. घटनास्थळावरून २ लाख ५५ हजार रुपये किमतीची ५ किलो १० ग्रॅम वजनाची गांज्याची झाडे जप्त करण्यात आली.

या प्रकरणी दोन्ही आरोपींविरोधात सोनई पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (एनडीपीएस कायदा) १९८५ च्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक विकास जाधव व पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, विकास साळवे, अशोक लिपणे, रमीझराजा आत्तार, अजिनाथ पाखरे व ज्योती शिंदे व सोनई पोलीस ठाण्याचे स.पो.नि.अनिल मोरे, पोलीस अंमलदार अंकुश दहिफळे, बाचकर, प्रविण क्षिरसागर, निखील तमनर, बनकरयांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.


**Truhome FINANCE**
**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)
**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई–६०००१८; **मुख्यालय** : लेव्हल – ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी–२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी नमूद केलेले कर्जदार यांनी ट्रुहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी होम फायनान्स लिमिटेडचे असे म्हणणे आहे की, हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहात. म्हणून या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम २००२ (सरफेसी कायदा) अन्वये आणि कलम – १३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्तावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सूचनेव्यतिरिक्त, त्यांना या जाहिर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३ (२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार, सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रक्कमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव/सह–कर्जदारांचे नाव व पत्ता | सुरक्षित मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचनेनुसार दिनांक व थकबाकी रक्कम रुपयात |
| --- | --- | --- |
| लोन क्रमांक – SLPHAMDR0000684/ TLPHAMDR0000956<br>१. श्रीमती शबाना उसमान शेख (कर्जदार)<br>२. श्री.नाजीश हबीब शेख (सह–कर्जदार)<br>३. M/S मीरा एंटरप्राइजेस (सह–कर्जदार)<br>सध्याचा पत्ता : शुक्लेश्वर रोड दारुवाला गल्ली समोर नूतन कन्या शाळा राहुरी, अहमदनगर–४१३७०५ दत्त कॉम्प्लेक्स शिवाजी रोड समोर, नूतन कन्या शाळा राहुरी अहमदनगर ४१३७०५<br>कर्जाची रक्कम – रु. ४९९५४१९/–<br>लोन क्रमांक – SLPHAMDR0000684<br>एनपीए तारीख – ०३/१०/२०२६<br>कर्जाची रक्कम– रु. ७४९३१३/–<br>लोन क्रमांक – TLPHAMDR0000956<br>एनपीए तारीख– ०३/१०/२०२६ | राहूरी बुद्रुक, तालुका राहूरी, जिल्हा अहमदनगर येथील सिटी सर्व्हे क्र. ९३१ वर बांधलेल्या 'दत्ता कॉम्प्लेक्स' मधील, महानगरपालिका घर क्र. W28000040 असलेली, पहिल्या मजल्यावरील 'फ्लॅट क्र. १' ही मालमत्ता, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:<br>पूर्व: मोकळी जागा,<br>पश्चिम: मोकळी जागा,<br>दक्षिण: मोकळी जागा,<br>उत्तर : जिना | मागणी सूचना दिनांक : १६–१०–२०२६<br>कर्ज खाते क्र. SLPHAMDRO000684 (दि. १२–१०–२०२६ रोजीची स्थिती) अंतर्गत ५३,९३,८५८.८८ रुपये (अक्षरी: त्रेपन्न लाख त्र्याण्णव हजार आठशे अठ्ठावन्न रुपये आणि ८८ पैसे) आणि कर्ज खाते क्र. TLPHAMDR0000956 (दि. १२–१०–२०२६ रोजीची स्थिती) अंतर्गत ८,४०,३०४.७२ रुपये (अक्षरी: आठ लाख चाळीस हजार तीनशे चार रुपये आणि ७२ पैसे) यासोबतच, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च इत्यादी. |
| लोन क्रमांक - SLPHAMDRO0000541<br>१. श्री.भूषण संतोष सातणकर (कर्जदार)<br>२. श्री.अनिता संतोष सातणकर (सह–कर्जदार)<br>पत्ता : ११३, सुचित कॉलनी, दत्त मंदिर, भूषणनगर, केडगाव, अहमदनगर शहर, महाराष्ट्र, अहमदनगर, ४१४००१<br>कर्जाची रक्कम – रु. १३६७८८१/–<br>लोन क्रमांक - SLPHAMDRO0000541<br>एनपीए तारीख – ०३/१०/२०२६ | सर्व्हे क्र. ६/२/७/२, प्लॉट क्र. C1/C26, ब्लॉक क्र. १३, गाव केडगाव, जिल्हा अहमदनगर येथील संपूर्ण भूखंड, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत–<br>पूर्व: ब्लॉक क्र. ११२ (श्री. गुंदेचा यांच्या ताब्यात)<br>पश्चिम: ब्लॉक क्र. ११४ (श्री. घोरपडे), दक्षिण: ब्लॉक क्र. १५३ (श्री. मेना)<br>उत्तर : अंतर्गत रस्ता | मागणी सूचना दिनांक – १६–१०–२०२६<br>मागणी सूचना रक्कम – रु. १३,२७,२३९.८०/– (अक्षरी: तेरा लाख सत्तावीस हजार दोनशे एकोणचाळीस रुपये आणि ऐंशी पैसे मात्र). ही रक्कम कर्ज खाते क्र. SLPHAMDR0000541 (दिनांक १२–१०–२०२६ रोजीची स्थिती) शी संबंधित असून, त्यासोबत यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज, तसेच अनुषंगिक खर्च इत्यादींचाही समावेश असेल. |
| लोन क्र – SLPHAMDR0000775<br>१. श्री. योगेश नंदू शेंडे (कर्जदार)<br>२. श्री. शेंडे नंदू सुखडे (सह–कर्जदार)<br>३. MRS. लक्ष्मी नंदू शेंडे (सह–कर्जदार)<br>पत्ता : १०७ माळीचिंचोरा नेवासा, मराठी शाळेजवळ अहमदनगर, महाराष्ट्र – ४१४६०२, शेंडे वखार आणि फॅब्रिकेशन माळी चिंचोरा भानसशिवरे रोड, नेवासा, अहमदनगर ४१४६०२<br>कर्जाची रक्कम – रु. २१११७७५/–<br>लोन क्र – SLPHAMDR0000775<br>एनपीए तारीख – ०३/१०/२०२६ | सर्व तुकडा आणि पार्सल ग्रामपंचायत मिळकत क्र.५६९, माळीचिंचोरा येथे वसलेले आहे जि.प.ची हद्द अहमदनगर ता. नेवासा आणि जि. अहमदनगर या अंतर्गत–<br>पूर्व: राहुलच्या मालकीचे मिळकत नं.५७० शेंडे<br>पश्चिम : भाऊसाहेबांच्या मालकीचे मिळकत शेंडे व जिजाबाई देवरे व रोड<br>दक्षिण: गजरे यांच्या मालकीचे मिळकत क्र.३७९ दगडू मंजाबापू आणि रोड<br>उत्तर : झेडपी पूर्व प्राथमिक शाळा आणि माळी चिंचोरा रोड. | मागणी सूचना दिनांक – १६–१०–२०२६<br>मागणी सूचना रक्कम – रु. २३,४२,६६६.१४/– (अक्षरी : तेवीस लाख बेचाळीस हजार सहाशे सहासष्ठ रुपये आणि चौदा पैसे मात्र), कर्ज खाते क्र. SLPHA-MDR0000775 च्या संदर्भात, दिनांक १२–१०–२०२६ रोजीच्या स्थितीनुसार. यासोबतच यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च, इतर खर्च इत्यादींचाही समावेश असेल. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते की,ही नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत पूर्णपणे भरणा करावी. असे करण्यात अयशस्वी ठरल्यास वर नमूद केलेल्या तारण मालमत्तेच्या अंमलबजावणीसाठी, 'सरफेसी' कायद्यांतर्गत कारवाई करण्यास आम्ही बाध्य होऊ. कृपया नोंद घ्या की, उक्त कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, आमच्या संमतीशिवाय वर नमूद केलेली तारण मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास तुम्हाला मनाई आहे.

ठिकाण : अहिल्यानगर
दिनांक : २२.१०.२०२६

सही/– अधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)


# शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्धच्या तक्रारींवर कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे 'महाराष्ट्र राज्य कारवाई आयोग' स्थापन करा

**मुख्यमंत्र्यांकडे ई मेल निवेदनाद्वारे मागणी**

नगर – शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध नागरिकांनी केलेल्या भ्रष्टाचार, कर्तव्यच्युती, गैरवर्तन, अधिकारांचा गैरवापर आणि प्रशासकीय निष्क्रियतेच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून विहित कालमर्यादेत अंतिम कारवाई करण्यासाठी स्वतंत्र वैधानिक 'महाराष्ट्र राज्य कारवाई आयोग' स्थापन करावा, अशी मागणी अभय ललवाणी यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांच्याकडे ई मेल निवेदनाद्वारे केली आहे.

शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध तक्रारी केल्यानंतर अनेकदा चौकशीला विलंब होतो, तक्रारी दीर्घकाळ प्रलंबित राहतात आणि तक्रारदारांना वारंवार पाठपुरावा करावा लागतो. काही प्रकरणांमध्ये संबंधित विभागाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचे उघडपणे दिसते. त्यामुळे प्रशासनातील उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रस्तावित आयोगाला स्वतंत्र चौकशी करणे, आवश्यक कागदपत्रे मागविणे, दोषी आढळणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाईसाठी निर्देश देणे आणि तक्रारींवरील अंतिम कार्यवाहीचा पाठपुरावा करणे असे वैधानिक अधिकार द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच तक्रारींच्या प्रत्येक टप्प्यासाठी निश्चित कालमर्यादा, ऑनलाइन तक्रार नोंदणी व स्थिती जाणून घेण्याची सुविधा आणि तक्रारींवर जाणीवपूर्वक कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची व्यवस्था असावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठित करून स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करावा, तसेच विद्यमान लोकायुक्त व्यवस्था, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि इतर वैधानिक यंत्रणांशी समन्वय निश्चित करावा, अशी मागणीही ललवाणी यांनी केली आहे.

नागरिकांना कायद्याच्या चौकटीत न्याय मिळावा, तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे आणि प्रशासकीय कारभारात पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढावे, हा या प्रस्तावामागील मुख्य उद्देश असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## होंडा ॲक्टिवाची चोरी; गुन्हा दाखल

नगर – अहिल्यानगर शहरातील संत निरकारी भवनसमोर उभी केलेली होंडा कंपनीची एक्टिवा मोपेड (क्र. एम.एच. १६ बी.जी. २४९८) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ ऑक्टोबर रोजी सकाळी सात ते आठ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत रविंद्र विल्यम गायकवाड (वय ६२, रा. प्रकाशपूर हाऊसिंग सोसायटी, मिस्कीनमळा रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – सावेडी परिसरातील कोषागार कार्यालयासमोर उभी केलेली हिरो होंडा कंपनीची पॅशन प्लस मोटारसायकल (क्र. एम.एच. १६ ए.जी. ७८७१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १५ ऑक्टोबर रोजी दुपारी एक ते तीन वाजेच्या दरम्यान घडली आहे. याबाबत साबीर अब्दुलज्ञाक शेख (वय ४५, रा. नाथनगर, पाथर्डी, ता. पाथर्डी) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आकाशवाणी केंद्राच्या परिसरातून तीन चंदनाच्या झाडांची चोरी

नगर – सावेडी उपनगरातील आकाशवाणी केंद्राच्या आवारातून अज्ञात चोरट्यांनी कंपाउंडच्या आत प्रवेश करून तीन चंदनाची झाडे तोडून त्यांचा गाभा चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ ऑक्टोबर रोजी पहाटे चार ते पाच वाजेच्या दरम्यान सावेडी येथील आकाशवाणी केंद्र व आकाशवाणी कॉलनीच्या परिसरामध्ये हा चोरीचा प्रकार घडला. आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रम अधिकारी तथा सुरक्षा अधिकारी सुदाम रंगनाथ बटुळे (वय ३८, रा. आकाशवाणी कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीनुसार, १३ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी आकाशवाणी केंद्राच्या परिसरातील कंपाउंड आतमध्ये प्रवेश केला. त्यानंतर तिथे असलेली तीन चंदनाची झाडे कापून त्यांचा गाभा चोरून नेला. या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## दुचाकीची चोरी करताना एकाला पकडले

नगर – अपघातानंतर रस्त्यालगत उभी केलेली दुचाकी दुचाकी चोरून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवकाला दुचाकीमालकाच्या मित्राने पकडले. या वेळी त्याच्यासोबत असलेले अन्य दोन साथीदार दुचाकी सोडून पळून गेले. ही घटना २० ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास केडगाव परिसरातील अहिल्यानगर–पुणे रोडवर कृष्णा वॉशिंग सेंटरशेजारी घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गौरव पांडुरंग बेल्हेकर (वय ३४. रा. नवीन गावठाण, केडगाव) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. सुशांत शिवाजी निक्रड (वय २१, रा. पाईपलाईन रोड, त्रिमुर्ती चोक, तागड वस्ती) याच्यासह दोघा अनोळखी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी बेल्हेकर यांच्या मित्राच्या दुचाकीचा १४ ऑक्टोबर रोजी अपघात झाला होता. त्यामुळे अपघातग्रस्त दुचाकी अहिल्यानगर–पुणे रोडवरील कृष्णा वॉशिंग सेंटरशेजारी उभी करण्यात आली होती. २० ऑक्टोबर रोजी रात्री बेल्हेकर आणि भारंबे हे केडगाव बायपास रोडवरील पपाकडे जात होते. त्यावेळी त्यानी अपघातग्रस्त दुचाकी नेताना एकाला पकडले तर दोघे पळून गेले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसानी गुन्हा नोंद केला आहे. संशयित पसार दोघांचा शोध पोलीस घेत आहेत.

